# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ / फाल्गुन २४, १९४४ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ६०**

-----------------------------------------------

## राज्यातील अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना अधिसंख्य पदाचा पदभार दिल्याबाबत

**(१) * १७८३८ श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक १६२०० ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केले नाही, अशा अधिकारी व कर्मचारी यांनी जात पडताळणी प्रकरणी मा.न्यायालयात याचिका दाखल केली असून, प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे सदरहू अधिकारी/कर्मचाऱ्यांची पुर्वीची पदस्थापना कायम ठेवून त्यांना अतिरिक्त स्वरुपात इतर कार्यकारी पदाचा अधिभार देण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अधिकारी व कर्मचारी यांना ज्या विभागात पदभार दिला आहे, त्या विभागात त्यांनी गैरव्यवहार केल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांना इतर कार्यकारी पदाचा पदभार देतांना मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन होत असतानाही मंत्रालय स्तरावरील आस्थापना विभागाचे प्रमुख, विभागीय आयुक्त, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या सदरहू अधिकारी/कर्मचारी यांना इतर कार्यकारी पदावर वर्ग करुन अधिसंख्य पदभार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक ३१४०/२०१८ मध्ये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांची पदे रिक्त करुन अनुसूचित जमातीच्या खऱ्या/मूळ (Genuine) उमेदवारांमधून माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत सदरहू पदे भरण्याबाबत दिलेल्या निर्णयानुसार जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या किती कर्मचाऱ्यांची पदे रिक्त केली व त्यापैकी किती कर्मचाऱ्यांची पदे अनुसूचित जमातीच्या खऱ्या उमेदवारांमधून भरण्यात आली आहेत, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना पदभार देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा प्रकारची तक्रार महसूल विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांसंबंधी प्राप्त झालेली आहे. या तक्रारींच्या अनुषंगाने महसूल विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) सर्व प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार ६८६० इतकी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून त्यापैकी १३४३ इतकी पदे अनुसूचित जमातीच्या खऱ्या उमेदवारांकडून भरण्यात आली आहे.
(५) व (६) याबाबत महसूल विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक कर्मचाऱ्यांच्या रात्रवस्ती भत्त्यांमध्ये वाढ करण्याबाबत

**(२) * १७५९२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक-वाहकांना अत्यल्प वेतन असताना गत चार वर्षांपासून कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या रात्रवस्ती भत्त्यांत वाढ करण्यात आली नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विशेषत: सोलापूर परिवहन विभागांतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी २०० राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक शेवटच्या बस स्थानकावर रात्री मुक्कामी जात असून सदरहू चालक व वाहकांना गावाच्या ठिकाणी रुपये ७५ भत्ता, तालुक्याच्या ठिकाणी रुपये ८० भत्ता व शहराच्या ठिकाणी रुपये १०० भत्ता दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्याच्या परिस्थितीमध्ये सदरहू मिळणारा रात्रवस्ती भत्ता तुटपुंजा असल्याने सदरहू भत्त्यांत वाढ करण्याबाबत लोकप्रतिनिधी व राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक कर्मचाऱ्यांच्या रात्रवस्ती भत्त्यांमध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक यांना दिनांक ३० जून, २०१८ च्या परिपत्रकीय सूचनांनुसार सुधारित दराने रात्रवस्ती भत्ता जुलै-२०१८ पासून अदा करण्यात येत आहे.

कामगार करार सन २०१६-२०२० या करारास अंतिम स्वरुप येत नसल्याने तसेच रा.प. महामंडळ व मान्यता प्राप्त संघटना यामध्ये समेट न झाल्यामुळे कामगार आयुक्तांनी सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे वर्ग केले असून सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३) * १७२३८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४४१ शासकीय वसतिगृहांपैकी ४९ वसतिगृहात अनियमितता झाल्याचे आढळून आल्यामुळे संबंधित वसतिगृहांच्या गृहपालांची समाज कल्याण आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, ग्रंथालय सुविधा, संगणक कक्ष सुस्थितीत असणे, प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रलंबित निर्वाह भत्ता देणे, स्वच्छतागृहात वीजेची सोय करणे, शैक्षणिक साहित्य वेळेवर देणे इ. कामे स्थानिक स्तरावर पूर्ण करण्याबाबत आवश्यक सूचना संबंधित गृहपाल व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांना देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त कार्यालयामार्फत सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गृहपालांना दिलेल्या सूचनेनूसार सदर कामे स्थानिक स्तरावर पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करुन शासकीय वसतिगृहांमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्यातील ५४ शासकीय वसतिगृहांची यादृच्छिक (Random) तपासणी करण्यात आली असता आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी ४९ शासकीय वसतिगृहांच्या गृहपालांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली असून २८ गृहपालांविरूध्द चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) भोजन ठेकेदाराविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली असून वसतिगृहांतील प्रवेशित विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य इत्यादी अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, शासकीय वसतिगृहातील अनियमितता प्रकरणी २८ शासकीय वसतिगृहांच्या गृहपालांविरुध्द नियमानुसार चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असून दोषारोपपत्र बजाविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४) * १६९८५ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२२ या वर्षातील ३६५ दिवसांपैकी २९ दिवस प्रदूषण मुक्तीचे ठरले असून ३३६ दिवस आरोग्यासाठी हानिकारक ठरले असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे केलेल्या हवा गुणवत्ता निरीक्षणातून सदर आकडेवारी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर शहरात व चंद्रपूर महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ परिसरातील खुटाळा गावात सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्र कार्यरत आहे. सदर तपासणी केंद्रामधून परिसरातील वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासण्यात येते. चंद्रपूर शहरातील सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील माहे जानेवारी-२०२२ ते डिसेंबर-२०२२ या कालावधीमधील सुमारे ३६५ दिवसांपैकी ९७ दिवसांच्या पृथ:करण अहवालानुसार श्वसनीय धुळीकणांचे (RSPM) मानक विहित मर्यादेपेक्षा कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते. तसेच चंद्रपूर महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ परिसरातील सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील माहे जानेवारी-२०२२ ते डिसेंबर-२०२२ या कालावधीमधील ३६५ दिवसांपैकी सुमारे १४ दिवसांच्या पृथ:करण अहवालानुसार श्वसनीय धुळीकणांचे (RSPM) मानक विहित मर्यादेपेक्षा कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

(२) मा.राष्ट्रीय हरीत लवादाच्या याचिका क्रं. १०३८/२०१८ संबंधीतील दिनांक १४/११/२०१९ रोजीच्या आदेशात भारतातील १०० प्रदूषित शहरांची यादीचा समावेश आहे. त्या यादीमध्ये चंद्रपूर शहराचा क्रमांक २७ व्या क्रमांकावर आहे व सदर निर्देशांक ७६.४१ इतका आहे (त्यातील हवा निर्देशांक ७५.०, जल निर्देशांक २३.७५ व जमीन निर्देशांक २३.७५). मंडळाने पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने प्रदूषणाबाबतचे गुणांकन कमी करण्याच्या दृष्टीने चंद्रपूर शहरालगतच्या ४ औद्योगिक क्षेत्राचा एकत्रित कृती आराखडा तयार केला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. तसेच चंद्रपूर शहरातील हवा प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेने चंद्रपूर शहर कृती आराखडा (Non-Attainment City Action Plan) तयार केला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(५) * १६९५१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा आधुनिक पध्दतीने विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी दिल्ली येथील मेसर्स डीडीएफ कन्सल्टंट या सल्लागाराला मुंबई विद्यापीठाचा आराखडा (मास्टर प्लान) तयार करण्यासाठी कंत्राट दिले असून ४० महिन्यांचा कालावधी होऊनही मुंबई विद्यापीठाचा आराखडा तयार झाला नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे कंत्राट एकूण रुपये १.१२ कोटींचे असून अद्यापपर्यंत मेसर्स डीडीएफ कन्सल्टंट या सल्लागाराला रुपये ५ लाख अदा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाचा आराखडा विहित मुदतीत सादर न करणाऱ्या सल्लागारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा बृहत आराखडा बनविण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक २८/०८/२०१९ रोजी M/s. DDF Consultants Pvt. Ltd. यांची नेमणूक करण्यात आली. त्यानुसार दिनांक १६/१०/२०१९ रोजी रुपये १,१२,७०,०००/- इतक्या रकमेच्या कामाचा करारनामा केला आहे. सल्लागाराद्वारे सदर करारानुसार प्राधिकरणास कार्य अहवाल-१ अंतर्गत दिनांक ०५/११/२०१९ रोजी प्रारंभ अहवाल आणि दिनांक ०९/०१/२०२० रोजी सक्षिप्त संकल्पचित्र अहवाल सादर केला आहे. दरम्यान मार्च २०२० मध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सल्लागारास पुढील कार्य अहवाल वेळेत सादर करणे शक्य झाले नाही. तद्नंतर सल्लागाराद्वारे प्राधिकरणास दिनांक १६/०३/२०२१ रोजी कार्य अहवाल-२A व कार्य अहवाल-२B आणि दिनांक २८/०४/२०२१ रोजी कार्य अहवाल-३ सादर केला आहे. दिनांक ०५/११/२०१९ रोजी सादर केलेल्या प्रारंभ अहवालास दिनांक ११/१२/२०१९ रोजी झालेल्या संकल्पचित्र आढावा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार सल्लागाराने सादर केलेल्या देयकानुसार रुपये ४,९६,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

तसेच सामंजस्य करारानुसार सुरू असलेल्या कामांच्या संदर्भात घेण्यात आलेल्या विविध बैठकांमध्ये मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील जमिनी इतर वापराकरीता जसे की, कौशल्य विद्यापीठ, भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतराष्ट्रीय संगीत महाविद्यालय आणि संग्रहालय इ. करीता जागा देण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकांमध्ये प्राप्त सूचना व सुधारणा याबाबीचा विचार करुन सल्लागारामार्फत संकल्पनात्मक बृहत आराखडा प्राधिकरणास दोन पर्यायासह सादर करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई विद्यापीठामार्फत यापैकी एका पर्यायाची निवड करून अंतिम बृहत आराखडा तयार करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(६) * १७५४३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५६१९ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातून जाणाऱ्या नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्पामुळे नौपाडा परिसरातील ५० हून अधिक इमारतींचा पुनर्विकास करणेसाठी महानगरपालिकेकडून परवानगी नाकारण्यात आल्यामुळे याबाबत पावसाळी अधिवेशन, २०२२ मध्ये मा.मंत्र्यांनी सदरहू प्रकल्प नागरिकांच्या अपेक्षांनुसार पूर्ण करणार असल्याचे आश्वासन दिले असूनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेऊन कार्यवाही करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडल्याप्रकरणी मार्ग काढण्याकरीता समन्वय समिती स्थापन करण्याबाबत केलेली मागणी विचारात घेऊन शासनस्तरावर समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे काय, समितीने त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ठाणे शहराच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव राज्य शासनाने मंजूरी प्रदान करुन केंद्र शासनास दिनांक २२/०३/२०१९ रोजी सादर करण्यात आलेला आहे. याप्रकल्पाच्या एकूण २९ कि.मी. लांबी पैकी ३ कि.मी. लांबी नौपाडा या उपशहरातून जात आहे. मेट्रो रेल्वे ॲक्ट १९७८ नुसार नवीन व जुन्या इमारतीच्या पुनर्विकासास मंजूरी ही केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरीनंतर व भूमिगत मार्गिकेच्या पूर्णतेनंतरच केली जाऊ शकते. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत जुन्या इमारतीच्या पुर्नविकास रखडल्याबाबत मार्ग काढण्याकरीता समन्वय समिती स्थापन करण्याबाबत केलेली मागणी विचारात घेऊन शासनस्तरावर अशी समिती स्थापन करण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) या संदर्भात आयुक्त, ठाणे महानगरपालिका व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन याच्या दरम्यान दिनांक ०२/०१/२०२३ रोजी बैठक झाली. या बैठकीमध्ये ठाणे महानगरपालिकेकडे पुनर्विकास ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत प्राप्त झालेले ३ प्रस्ताव महा-मेट्रोकडे छाननीसाठी पाठविण्यात यावे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर लोकहिताचा विचार करुन लवकरात लवकर ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येईल. बैठकीत असे निश्चित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे खाडीतील प्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(७) * १७४३२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडीला रामसर दर्जा मिळाल्याचे प्रमाणपत्र शासनाला मिळाले असतानाही खाडीतील प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असून खाडीमध्ये तीन डम्पिंग ग्राऊंडमधून सांडपाणी मिसळले जात असून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामधील कारखान्यांतून रसायनमिश्रीत पाणी खाडीत सोडले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडीत सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रीत पाण्यामुळे खाडीतील माशांच्या पुनरुत्पादनावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे येथील खाडीमधील प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार ठाणे येथील खाडीत सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रीत पाण्यामुळे खाडीतील माशांच्या पुनरुत्पादनावर परिणाम झाल्याची कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) नागरी घन कचरा (प्रक्रिया व विल्हेवाट) अधिनियम, २०१६ च्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत अकोला महानगरपालिकेस प्राप्त निधीचे मनमानी पध्दतीने वाटप केल्याबाबत

**(८) * १७३६९ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत अकोला महानगरपालिकेस शासनाकडून रुपये २० कोटींचा निधी सन २०२२ मध्ये प्राप्त झाला असून त्यानुसार अकोला महानगरपालिकेने कामांच्या निविदा मागविल्या असल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी वाटपाचे निकष लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ करीता रुपये ७० लाख रुपयांची तरतूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत लोकसंख्येच्या निकषानुसार प्रभाग निहाय प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत सादर करणे आवश्यक असताना तसे न करता निधी वाटपात बांधकाम विभागाने मनमानीपणे निधी वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निकषांचे उल्लंघन करुन शासनाकडून प्राप्त निधीचे मनमानी पध्दतीने वाटप करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सर्वसाधारणपणे लोकसंख्येच्या प्रमाणात उतरत्याक्रमाने व पायाभूत सुविधांची निकड लक्षात घेऊन, तसेच, समाज कल्याण विभागाद्वारे स्थळ तपासणी अहवाल घेऊन कामे मंजूर केली असल्यामुळे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने मनमानीपणे निधी वाटप केलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेतील विकासकामांचा निधी अप्राप्त असल्याबाबत

**(९)** * **१७६८९ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे शासकीय अनुदानातून करण्यात येत असलेल्या अनेक विकास कामांचे अनुदान नागपूर महानगरपालिकेस प्राप्त झाले नसल्यामुळे सदरहू कामे सुरु होऊन निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र. मनपा २०१९/प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेची रुपये १५७ कोटींची कामे मंजूर करण्यात आली असून सदरहू कामांचा निधी अद्यापी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण, चांदमारी येथील रस्ता बांधणी, शुक्रवारी तलाव सौंदर्यीकरणाकरीता अनुक्रमे रुपये ९ कोटी, रुपये ३ कोटी व रुपये १९ कोटींचा निधी शासनाकडे प्रलंबित असून सदरहू निधी मिळणेकरीता मा.लोकप्रतिनिधी व महानगरपालिकेने शासनाकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर महानगपालिकेतील विकासकामांचा प्रलंबित निधी वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) • शासन निर्णय क्र.मनपा २०१९/प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १५७ कोटींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.

• शासन पत्र दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ अन्वये "कृषी विद्यापीठ सायकल ट्रॅक" या कामाचा रुपये ९.४३ कोटी निधी "भोसलेकालीन सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण करणे" या कामासाठी वर्ग करण्यास मान्यता दिलेली आहे.

- हिवाळी अधिवेशन डिसेंबर, २०२२ मध्ये पुरवणी मागणीद्वारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात अनधिकृत इमारतींची बांधकामे सुरु असल्याबाबत

**(१०) * १७०२२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका, घोडबंदर, कळवा, मुंब्रा आणि दिवा (जि.ठाणे) येथील भागात एकाचवेळेस १५० ते १७० बेकायदा इमारतींची अनधिकृत बांधकामे सुरु असून त्यातील काही इमारती कोसळून ७४ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत बांधकामांविरोधात तत्कालीन आयुक्तांनी काही महिन्यांपूर्वी सुरु केलेली कारवाई सध्या बंद झाली असल्याचे निदर्शनास आले असून, विद्यमान आयुक्तांनी शहराच्या सौंदर्यीकरणासाठी शेकडो कोटी रुपये खर्च केले असूनही मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांच्या गैरकारभार व आर्थिक संगनमतामुळे मुंब्रा आणि कळवा भागात अतिक्रमण विभागाने तोडकाम केलेल्या व हरित पट्ट्यात पुन्हा अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे व मुंब्रा-कळवा मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींनी अनधिकृत बांधकामाप्रकरणी वेळोवेळी प्रशासनाकडे छायाचित्र व चित्रफितींसह अन्य पुरावे देऊनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील पायाभूत सुविधांवर अनधिकृत/बेकायदा बांधकामांचा ताण पडत असून शहराचा सुनियोजित विकास करण्यासाठी आखण्यात आलेल्या क्लस्टर योजनेलाही अडथळा निर्माण होत असून गृह खरेदीदारांची देखील फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामास सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अनधिकृत इमारतींची बांधकामे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार घोडबंदर, कळवा, मुंब्रा आणि दिवा क्षेत्रामध्ये निदर्शनास आलेल्या अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार वेळोवेळी नियमोचित कारवाई करण्यात येते.

तसेच माहे जानेवारी, २०२३ व त्यादरम्यान महानगरपालिका क्षेत्रात इमारत कोसळून जीवितहानी झालेली नाही.
(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत/बेकायदा बांधकामावर शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनानुसार सातत्याने व नियमितपणे कायदेशीर कारवाई करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम संदर्भात शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारी वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेस पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून शासन निर्णय दिनांक ०२/०३/२००९ मधील विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणे तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम नियंत्रण व निर्मूलन करण्याकरीता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणेबाबत शासन स्तरावरुन दिनांक २६/१२/२०२२ रोजी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) शहर क्षेत्रातील अनधिकृत/बेकायदेशीर बांधकामामुळे त्या शहराच्या पायाभूत सोईसुविधांवर ताण पडतो ही वस्तूस्थिती आहे. तथापि, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येणारी क्लस्टर योजना ही स्वतंत्र बाब असून शासनाने निर्धारित केलेल्या नियमावलीनुसार योजनेची अमंलबजावणी केली जात आहे.

(५) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामास आळा घालण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०२/०३/२००९ मधील विहित कार्यपध्दतीचा काटेकोरपणे अवलंब करणे संदर्भात शासन पत्र दिनांक २२/०२/२०२३ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * १७५१९ श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ८४० सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचे आदेश सन २०१८ मध्ये तत्कालिन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिले असून ४ वर्षांचा कालावधी होऊनही सुरक्षा रक्षकांची भरती करण्याबाबत महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतींची सुरक्षा करण्यासाठी ६९ सुरक्षा रक्षक कर्मचारी हे ३ पाळी मध्ये कार्यरत असून यामधील २४ जागा रिक्त आहेत, तसेच सुरक्षा रक्षकांच्या रिक्त पदांमुळे कार्यरत सुरक्षा रक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा व्यवस्था अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यःस्थितीत सुरक्षारक्षक विभागात २३४७ पदे कार्यरत असून १७३५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सन २०१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त झाल्याने सरळसेवेने पदे भरण्याचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरीता सादर करण्यात आला होता.त्यानुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १२/०१/२०१८ रोजी, सुरक्षा रक्षकांची ५० टक्के रिक्त पदे सरळसेवेने व ५० टक्के रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता मंजूरी दिली.

दरम्यान बिंदूनामावल्यांची पडताळणी तसेच दिव्यांग व्यक्तींकरीता आरक्षण, सामाजिक-शैक्षणिक व मागासवर्ग आरक्षण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता आरक्षण अशा आरक्षणांचा नव्याने अंतर्भाव झाल्याने उपरोक्तप्रमाणे नव्याने प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करण्यात आला.

दरम्यानच्या काळात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या आदेशान्वये, महसूल आणि खर्चातील आर्थिक काटकसरीच्या धोरणाची अंमलबजावणी करताना उपाययोजना म्हणून फक्त अनिवार्य सेवांमध्ये थेट संबंधित असणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदभरती करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले. यास्तव, सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला.

तद्नंतर माहे मार्च २०२० ते माहे एप्रिल, २०२१ या कालावधीत कोरोना महामारीची परिस्थिती निर्माण झाल्याने सरळसेवा भरतीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

माहे मे, २०२१ मध्ये महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने भरती प्रक्रियेबाबतचा प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात आला. सदर कार्यवाही दरम्यान सुरक्षा रक्षक पदाच्या अर्हता कालबाह्य असल्याने त्या सुधारित करणे आवश्यक होते. यास्तव, सदर अर्हता सुधारित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतींची सुरक्षा करण्यासाठी सुरक्षा रक्षकांची ९७ मंजूर पदे आहेत. त्यापैकी २९ पदे रिक्त असून ६८ पदे कार्यरत आहेत. या ६८ सुरक्षा रक्षकांमार्फत तीन सत्रामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाची सुरक्षा पार पाडली जाते.

(३) सद्यःस्थितीत सुरक्षा रक्षक विभागात सुरक्षा रक्षकांची ३८०९ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १७६२ पदे रिक्त असून २०४७ पदे कार्यरत आहेत.

(४) माहे मे, २०२१ मध्ये महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने भरती प्रक्रियेबाबतचा प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात आला. सदर कार्यवाही दरम्यान सुरक्षा रक्षक पदाच्या अर्हता कालबाह्य असल्याने त्या सुधारित करणे आवश्यक होते. यास्तव, सदर अर्हता सुधारित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत

**(१२) * १७१३८ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळणेबाबत तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना (१०-२०-३०) आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना (१०-२०-३०) आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ लागू करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना (१०-२०-३०) आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाने अमान्य केली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * १७७९९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील कारखान्यातून मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जित होत असल्याने या परिसरातील शेती पिकांवर काजळी पडून पिके खराब झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याचे तसेच प्रदूषित वातावरणामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील कारखान्यांच्या चिमण्यांची उंची, कारखान्याने वापरलेल्या पाण्याचे रिसायकलिंग न करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया न करणे इ. बाबींवर कारवाई करण्याकडे प्रदूषण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याने सदरहू कारखाने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन प्रदूषण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भंडारा जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करुन प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील कंपन्या मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जित करीत असल्याचे बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आली नाही.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा यांच्या प्राप्त अहवालानुसार याबाबतीत कोणतीही नुकसानीचे अर्ज अथवा तक्रार त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याचे नमुद करण्यात आले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून दिनांक २२/०२/२०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार श्वसन संस्थेचे आजार औद्योगिक वसाहतीतील उद्योग व कारखान्याद्वारे सोडण्यात येणाऱ्या धुर, धुरामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे देखील कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील भांडेवाडी डंपिंग यार्डमधील कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करुन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(१४) * १७२७७ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६५४६ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील भांडेवाडी डंपिंग यार्डमध्ये प्रतिदिन ५०० मेट्रीक टन कचऱ्यावर बायोमाइनिंगची प्रक्रिया करण्याकरीता नेदरलँड येथील कंपनीने नागपूर महानगरपालिकेसोबत अनुबंध करार केला होता तथापि, सदर कंपनीचे काम बंद असल्यामुळे मागील चार वर्षांपासून कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंद असून १६ लाख टन कचरा प्रक्रियेविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडेवाडी परिसरातील डंपिंग यार्डमुळे नागरिकांना दुर्गंधीचा व आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याने येथील नागरिकांनी आंदोलने करुन सदर डंपिंग यार्ड हटविण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भांडेवाडी डंपिंग यार्डमधील कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याबाबत तसेच सदरहू डंपिंग यार्ड इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

भांडेवाडी डंपिंग यार्ड मध्ये प्रतिदिन ५०० मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करण्याकरीता नेदरलँड येथील कंपनी बरोबर नागपूर महानगरपालिकेकडून करार करण्यात आलेला नाही.

नागपूर शहरातील भांडेवाडी डंपिंग यार्ड मध्ये साईंटिफिक लॅन्डफिल साईट मध्ये अंदाजे २०.०० लक्ष मे.टन जुना कचरा जमा असून यापैकी ०६.०० लक्ष मे.टन कचऱ्याचे बायोमायनिंग करुन योग्यरित्या विल्हेवाट लावून जागा रिकामी करण्याकरीता नागपूर स्मार्ट सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉरपोरेशन यांचेद्वारे मे.झिग्मा ग्लोबल इनवायरन सोल्युशन प्रा.लि. यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात येवून प्रत्यक्षात काम दिनांक ०१/०१/२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे. आजपावेतो ०२.०० लक्ष मे.टन जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आलेली असून सदर काम डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) हे खरे नाही.

सदर डंपिंग यार्ड हटविण्याबाबत नागरिकांनी आंदोलने केलेली नसून याबाबत मागणी नागपूर महानगरपालिकेला प्राप्त झालेली नाही.

(३) भांडेवाडी येथील जमा झालेल्या अंदाजे २०.०० लक्ष मे.टन कचऱ्यांपैकी ०६.०० लक्ष मे.टन जुन्या कचऱ्यांवरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अंदाजे १४.०० लक्ष मे.टन जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया व्हायची असून SBM २.० अंतर्गत साठलेल्या जुन्या कचऱ्यांपैकी १०.०० लक्ष मे.टन कचऱ्यांवर बायोमायनिंग करण्याकरीता रुपये ४२.८० कोटींचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच, SBM १.० अंतर्गत सुधारित मंजूर घनकचरा व्यवस्थापनाच्या विस्तृत प्रकल्प अहवालात नमूद सॅनिटरी लँडफिल निर्माणकरीता रुपये ११७.३५ कोटींची मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने व स्मार्ट सिटीमार्फत सुरु असलेले बायोमायनिंगचे काम २५% पूर्ण झाल्यामुळे जागा उपलब्ध होत असल्याने निविदा प्रक्रियेचे काम सुरु करण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे भांडेवाडी येथे दैनंदिन येणाऱ्या १०००-१२०० मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याकरीता आंतरराष्ट्रीय पातळीवर निविदा बोलाविण्यात आल्या. त्यामध्ये M/s SusBDe Holding B.V.(JV) यांची L१ निविदा प्राप्त झालेली असून त्यांना दिनांक ०६/१०/२०२२ रोजी Letter of Intent देण्यात आलेले असून त्यांच्याशी करारानामा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुलाबा (मुंबई) येथील वांद्रे सीप्झ मेट्रो ३ साठी बांधण्यात येणाऱ्या कारशेडची जागा बदलण्याबाबत

**(१५) * १७५९९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील वांद्रे सीप्झ मेट्रो ३ साठी आरेच्या जंगलात बांधल्या जाणाऱ्या कारशेडच्या इमारती उभ्या करण्यास कंत्राटदार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आरे च्या जंगलात होणाऱ्या मेट्रो कारशेडला विरोध होत असल्याने मेट्रो कारशेडची जागा बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, स्थापत्य कामासाठी कंत्राटदाराची नेमणूक जून २०१७ मध्येच करण्यात आलेली आहे.

(२) व (३) मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरीता पर्यायी जागा निश्चित करण्यासंबंधी राज्य शासनास शिफारस करण्याकरीता माहे जानेवारी २०२१ मध्ये मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालमध्ये कारडेपोमुळे होणाऱ्या परिचालन, मेट्रो मार्ग-३, ४, ४-अ आणि ६ यांचेसाठी एकात्मिक कारडेपो कांजूरमार्ग येथे उभारण्याची शिफारस केली होती. तथापि, यासंबंधी तांत्रिक बाबी तपासण्यात आल्या आहेत. कांजूरमार्ग येथील जागेच्या मालकी हक्कासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ५९८३/२०२० मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १६/१२/२०२० रोजीच्या अंतरिम आदेशाद्वारे स्थगिती दिलेली होती. तसेच केंद्र शासनाने आरे येथील डेपो कांजूरमार्ग येथे स्थलांतरीत करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी सूचना केल्याने सार्वजनिक हिताचा प्रकल्प असल्याने व आरे येथील कार डेपोसाठी आरक्षित जागा वन क्षेत्रात समाविष्ट नाही. या बाबी विचारात घेतल्यास प्रकल्प पूर्ण करण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी आरे येथे कार डेपो उभारण्याबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेली स्थगिती शासनाच्या दिनांक २१/०७/२०२२ च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. सद्य:स्थितीत आरे येथे कार डेपो उभारणीचे काम प्रगतीत आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील जल-वायू प्रदूषणामुळे मच्छिमार बांधवांच्या व्यवसायास धोका निर्माण झाल्याबाबत

**(१६)** * **१७३४४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील एडवण, कोरे, दातिवरे, उसरणी (ता.पालघर) तसेच उत्तनपासून (ता.वसई) ते झाईपर्यंत (ता.तलासरी) समुद्रकिनाऱ्यांवर तिवरांच्या मुळावर काही दिवसांपासून मेणसदृश्य तेलकट रासायनिक थर साचणे, प्लास्टिकचा कचरा, पिशव्या, बाटल्या मच्छिमारांच्या जाळयात दिसून येणे, सदर कचरा जाळल्यास त्यातून काळा धूर निघून दुर्गंधी पसरणे, त्यामुळे जल-वायू प्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परंपरागत चालत आलेला मच्छिमार बांधवांचा व्यवसाय धोक्यात आल्याने त्यासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही करण्याबाबत मच्छिमार बांधवांनी मा.मुख्यमंत्री, मा.मत्स्य व्यवसाय मंत्री व प्रधान सचिव, मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी होत असलेले जल-वायू प्रदूषण रोखून मच्छिमार बांधवांचा परंपरागत व्यवसायास अडथळा येऊ नये याकरीता उपाययोजना करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी प्रदूषणकारी उद्योगांवर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) * १७८५४ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७८४ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयात माहे जुलै, २०२० पासून पूर्णवेळ प्रादेशिक परिवहन अधिकारी नसल्याने नागरिकांना वाहनांसंबंधी विविध कामे मंजूर करण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयात एक सहायक परिवहन अधिकारी कार्यरत असून प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अशी तीन पदे अद्यापि रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन कार्यालतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद जुलै, २०२० पासून रिक्त आहे. तथापि, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे देण्यात आला असून संबंधित कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.

या कार्यालयातील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील १ पद व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील २ पदे भरलेली आहेत.

(३) या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) * १७७५९ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर ४६६१ पदांपैकी १७८२ पदे रिक्त असून कोल्हापूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील रिक्त असलेली ८३ पदे भरण्याची मागणी कॉमन मॅन व प्रजासत्ताक सामाजिक संस्थेने उपायुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांचेकडे निवेदनांद्वारे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त उत्पन्न नोकर पगारावर खर्च न करण्याचे बंधन घातल्यामुळे महानगरपालिकेस मंजूर पदे भरण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील पदे मंजूर असूनही जाचक अटीमुळे रिक्त पदे भरता येत नसल्याकारणामुळे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा कार्यभार येत आहे, तसेच ठोक मानधनावर कर्मचारी नेमून प्रशासकीय कामकाज पार पाडावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सहावा व सातवा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता दिल्यामुळे नोकर भरतीसंदर्भात महानगरपालिका उत्पन्नाच्या ३५ टक्क्यांची अट कालबाहय ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेतील ३५ टक्क्यांची जाचक अट शिथिल करुन कोल्हापूर महानगरपालिकेत रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन दिनांक ०१/१२/२०२२ रोजी महानगरपालिकेस दिले, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय, दिनांक ०४/०५/२००६ अन्वये आस्थापना खर्चाची मर्यादा ३५% इतकी निश्चित करण्यात आली, हे खरे आहे.
(३) कोल्हापूर महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील पदे ठोक मानधन करार तत्वावर भरण्यात आली आहेत, हे खरे आहे.
(४) व (५) महानगरपालिकांच्या आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेची व अत्यंत गरजेची पदे भरण्यासाठी सन २०२३ च्या पदभरतीकरीता शासन निर्णय, दिनांक ०४/०५/२००६ मधील आस्थापना खर्चाची ३५% मर्यादेची अट शिथिल करण्यात आली असून कोल्हापूर महानगरपालिकेच्या मागणीनुसार आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेतील १८२ इतकी पदे भरण्यास दिनांक १४/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांची पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * १६९४१ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांची पदोन्नती कोट्यातील सुमारे २०० पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयातील कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देतांना शासनाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या धोरणानुसार कार्यवाही होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांच्या पदोन्नती कोट्यात प्रतिनियुक्तीच्या पदांसह किती पदे रिक्त आहेत व सदर पदे भरण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) नाही.

मंत्रालयीन कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देतांना शासनाच्या दिनांक ७ मे २०२१ च्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे मागास प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात स्पष्ट तरतूद नसल्याने न्यायालयीन प्रकरणे उद्भवली आहेत.

(३) सद्य:स्थितीत कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नत कोट्यात माहे डिसेंबर-२०२२ अखेर रिक्त असणारी सर्व पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (महाराष्ट्र नगर) येथील साईदिप सहकारी गृहनिर्माण (नियोजित) सोसायटीमधील वास्तव्य करणाऱ्या लोकांनी सोसायटीचा ताबा अवैधरित्या घेतल्याबाबत

**(२०)** * **१७१६६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (महाराष्ट्र नगर) येथील शिवशाही प्रकल्पांतर्गत साईदिप सहकारी गृहनिर्माण (नियोजित) सोसायटी बांधण्यात आलेली असून, सदर सोसायटीमधील ११२ रुमपैकी २३ लोकांनाच मालकी हक्क मिळाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोसायटीमधील रुम नंबर ६०३/६०४, ३०३/३०४ मध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांनी पूर्णपणे सोसायटीचा ताबा घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुममध्ये वास्तव्य करित असलेले लोक इतरांना राजरोसपणे धमकावत आहेत व रहिवाशांकडून महिन्याला रुपये पाच ते सहा हजार देखभाल म्हणून वसूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी सोसायटीतील रहिवाशांनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुनही कोणतीच दखल घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर तसेच पोलीस अधिकायांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मानखुर्द (महाराष्ट्र नगर) येथील शिवशाही प्रकल्पांतर्गत साईदिप सहकारी गृहनिर्माण (नियोजित) सोसायटीमध्ये ११२ पैकी ७४ लोकांना मालकी हक्क मिळाला आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर सोसायटीमधील रुम नंबर ६०३ व ६०४ मध्ये वास्तव्यास असलेले श्री.अशोक पाटील व श्रीमती उषा अशोक पाटील यांनी घुसखोरी केली असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तक्रारीस अनुसरुन संबंधितांविरोधात ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात दिनांक १०/०२/२०१५ रोजी प्रथम खबर अहवाल (एफ.आय.आर.) करण्यात आला असून, कलम ४४८, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर सदनिकांच्या मालकी हक्काबाबत श्री.अशोक पाटील व श्रीमती उषा अशोक पाटील यांनी एल.सी. सूट क्रमांक ४२३२/२०१४ अन्वये मा.मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे.

सदर दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

तसेच, सदनिका क्रमांक ३०३ व ३०४ या सदनिका श्री.मोहन सुखदेव देवाडकर व श्री.हनुमान सुखदेव देवाडकर यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वितरित करण्यात आल्या आहेत, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाणे यांना प्राप्त अर्जास अनुसरुन गैरअर्जदार श्रीमती लक्ष्मी अशोक पाटील यांच्याविरुध्द दिनांक ११/०९/२०२२ रोजी अदखलपात्र गु.र.क्र. १३४७/२०२२, कलम ३२३, ५०४ भादंवि अन्वये दाखल केला असून, सद्य:स्थितीत त्यांच्यामध्ये कोणताही वाद नाही. सदर अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आलेला आहे, असे गृह विभागाने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेची लोअर परळसह अन्य भागातील वाहनतळे स:शुल्क करण्याच्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत

**(२१) * १७०९३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण (G/SOUTH) विभागांतर्गत येणाऱ्या श्रीनिवास कॉटन मिल्स, शंकरराव नरम पथ आणि सेनापती बापट मार्ग, लोअर परळ स्थित सिटी सर्व्हे क्र. ४४३, ४४४, २/४४५ आणि ४४६ येथील व मुंबईतील अन्य ठिकाणचे सर्वसामान्यांसाठी उपलब्ध असलेले महानगरपालिकेचे वाहनतळ देखभाल व व्यवस्थापनाकरीता खाजगी कंपनीस देण्याबाबतचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वाहनतळ दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून स:शुल्क करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निर्णयामुळे मुंबईतील रस्ते आणि पुलांची विकासकामे मोठ्या प्रमाणावर सुरु असल्याने सद्य:स्थितीत सर्वसामान्य रहिवाशांना वाहन पार्किंगसाठी जागाच उपलब्ध नसल्याने गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेची लोअर परळसह अन्य भागातील वाहनतळे स:शुल्क करण्याच्या निर्णयास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागांतर्गत येणाऱ्या श्रीनिवास कॉटन मिल्स, शंकरराव नरम पथ आणि सेनापती बापट मार्ग, लोअर परळ स्थित सिटी सर्व्हे नं. ४४३, ४४४, २/४४५ आणि ४४६ येथील महानगरपालिकेचे वाहनतळ प्रचलित धोरणानुसार देखभाल व व्यवस्थापनाकरीता कंत्राटदारास देण्यात आले आहे. त्याकरीता दिनांक २७/१२/२०२२ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर वाहनतळामध्ये महानगरपालिकेने निश्चित केलेले शुल्क अदा करुन कोणीही सर्वसामान्य वाहनचालक आपले वाहन पार्क करु शकतो.

(२) हे खरे आहे.

महानगरपालिका ठराव क्रमांक १०४८, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये, बृहन्मुंबईतील वाहनतळांकरीता दर ठरविण्यात आले आहेत. या ठरावानुसार सदर वाहनतळाचे दर ठरविण्यात आले होते. परंतु सदर वाहनतळाकरीता महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणाप्रमाणे ६ वेळा निविदा प्रक्रिया करुन सुध्दा प्रतिसाद मिळला नव्हता.त्यामुळे या वाहनतळाचा उपयोग व्हावा आणि लोकांना सुविधा मिळावी म्हणून वाहनतळ तात्पुरत्या स्वरुपात म्हणजेच जोपर्यंत कंत्राटदार नियुक्त होत नाही तोपर्यंत वापरकर्त्यांना 'मोफत' वापराकरीता उपलब्ध करुन देण्यात आला होता.

निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळाल्यानंतर सदर वाहनतळाकरीता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) वाहनतळाकरीता पार पाडण्यात आलेली निविदा प्रक्रिया व नियुक्त करण्यात आलेला कंत्राटदार हे महानगरपालिकेच्या मंजूर वाहनतळ धोरणाप्रमाणे आहेत. यामुळे वापरकर्त्यांना व नागरिकांस पुरेशा सोयी उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मर्ढे (ता.जि.सातारा) येथील कविवर्य बा.सी. मर्ढेकर स्मारकाचे उद्‌घाटन करण्याबाबत

**(२२) * १७८८१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मर्ढे (ता.जि.सातारा) येथे मराठी कवितेला एक नवा चेहरा देणारे, मराठी समीक्षेत नव्या संकल्पना रुजविणारे युगप्रवर्तक कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांचे स्मारक उभारण्याबाबत साहित्यीक क्षेत्रातील नामवंत तसेच लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने स्मारक उभारण्यासाठी रुपये ४८ लाख ७६ हजार ८४ इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक ३० ऑक्टोबर, २००७ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्मारकाचे काम पूर्ण करण्यात आले असून कविवर्य मर्ढेकरांचा जन्मशताब्दी वर्षाच्या सांगता सोहळ्याचा कार्यक्रम या स्मारकात घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्मारक उभारण्याचे काम पूर्ण होऊन बरीच वर्षे उलटून गेली तरी अद्यापही स्मारकाचे उद्‌घाटन करण्यात आले नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कविवर्य बा.सी.मर्ढेकरांच्या स्मारकाचे उद्‌घाटन करुन सदर स्मारक साहित्यप्रेमी व अभ्यासकांसाठी खुले करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) होय.
कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकाचे काम पूर्ण झाले असून स्मारक इमारत ग्रामपंचायत मर्ढे ता.जि.सातारा यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर स्मारकाचे उद्‌घाटन करणे तसेच हे स्मारक साहित्यप्रेमी व अभ्यासक यांना खुले करण्याच्या दृष्टीने स्मारकाच्या उद्घाटनाबाबत स्मारक समिती बरोबर बैठक आयोजित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदगाव (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) समुद्र किनाऱ्यालगत वाणिज्य इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत

**(२३) * १७९५४ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदगाव (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) समुद्र किनाऱ्यालगत किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) कायद्याचे उल्लंघन करुन एका वाणिज्य इमारतीचे बांधकाम करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या महामार्ग नियमानुसार चाळीस फुट अंतर सोडून बांधकाम करणे बंधनकारक असताना देखील शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन सदरहू बांधकाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांनी दिनांक ०१/०३/२०२३ रोजी संबंधितांस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार नोटीस बजावली असून सदर बांधकाम निष्कासित करण्याची कायदेशीर कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व अन्य देणी अदा करण्याबाबत

**(२४) * १८०८० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सन २०२१ पासून सेवानिवृत्त झालेल्या २००० कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर उपदानाची देणी महानगरपालिकेकडून अदा करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच विभागीय कार्यालयाकडे तात्पुरते निवृत्ती वेतन मिळण्याबाबत दोन वर्षांपासून लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही महानगरपालिकेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व अन्य देणी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून सन २०२१ ते माहे जानेवारी, २०२३ या कालावधीत एकूण ८१२० कर्मचारी निवृत्त झाले असून, त्यापैकी ६२९५ कर्मचाऱ्यांचे दावे मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, १८२५ दावे प्रलंबित असून, त्यांचा निपटारा करण्याचे काम सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) अशा आशयाच्या मागणीचे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (१९५३) नियम क्रमांक ४५ (अ) नवीन नियम अन्वये (१)(अ) तसेच दिनांक २६/०६/२००० रोजीच्या परिपत्रकान्वये खात्यांतर्गत चौकशी अथवा न्यायिक स्वरुपाची प्रक्रिया सुरु असल्यास अशा कर्मचाऱ्यास तात्पुरते निवृत्तीवेतन दिले जाते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व अन्य देणी देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली वा करण्यात येत आहे :-

- संबंधित खाते/विभाग कार्यालयातील कर्मचारी यांना प्रलंबित दावे मानव संसाधन कार्यप्रणालीतून विहित वेळेत कार्यान्वित करण्याकरीता मार्गदर्शन देऊन त्रुटींची पूर्तता करण्याकरीता पाठपुरावा केला जात आहे.
- विभागीय कार्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन दाव्यांमध्ये वसुली, रजा, निवासस्थान, चौकशी, नामनिर्देशन इ. प्रकरणांबाबतच्या कागदपत्रांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करुन दावा निवृत्तीवेतन विभागात प्राप्त झाल्यानंतर दाव्यांची पडताळणी करुन निवृत्तीवेतन व वेतनादी लाभांचे महिन्यातून चारवेळा ई.सी.एस. द्वारे अधिदान करण्यात येते.
- खातेस्तरावर विलंब होत असल्यामुळे मार्गदर्शनाकरीता मानव संसाधन कार्यप्रणालीत परिपूर्ण निवृत्तीवेतन दावे सादर करण्यापासून ते अधिदानापर्यंतच्या सर्व कार्यवाहीबाबतची परिपत्रके वेळोवेळी प्रमुख लेखापाल (कोषागार) विभागाकडून निर्गमित करण्यात आली आहेत.

- तसेच, खातेस्तरावर प्रलंबित निवृत्तीवेतन दाव्यांबाबत कार्यवाही न झाल्याने निवृत्तीवेतन दक्षता उपविभागाकडून संबंधित विभाग प्रमुखांना/कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनपर सूचना देऊन पाठपुरावा करण्यात येतो. तथापि, कर्मचाऱ्यांचे अनिर्णित रजा प्रश्न, चौकशी, निलंबन कालावधी, जातवैधता प्रमाणपत्र, महानगरपालिका निवासस्थानाबाबतची कागदपत्रे विहित वेळेत सादर केली जात नाहीत. या कारणांमुळे अधिकांश दावे अधिदानास प्रलंबित राहतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील दादर, टिळक नगर व वांद्रे स्टेशन परिसरात वाढीव प्रवासी भाडे आकारणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांवर कारवाई करण्याबाबत

**(२५) * १८१७३ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील दादर, टिळक नगर व वांद्रे स्टेशन परिसरातील रिक्षा व टॅक्सी चालक रात्रीच्या वेळी प्रवाशांकडून तीन ते चारपट प्रवासी भाडे आकारुन प्रवाशांची आर्थिक लूट करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्षा व टॅक्सीचे वाढीव दर आकारणाऱ्या दादर, टिळक नगर व वांद्रे स्टेशन परिसरातील रिक्षा व टॅक्सी चालकांवर कारवाई करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहरात वाढीव प्रवासी भाडे आकारणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांवर कारवाई करुन रात्रीच्यावेळी रिक्षा व टॅक्सीचे प्रवासी भाड्यांचे दर नियंत्रणात ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ०३/०८/२०२२ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) व (३) मोटार वाहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे जादा प्रवासी भाडे आकारणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांवर मोटार वाहन अधिनियम व त्याअंतर्गत नियमातील तरतुदीनुसार नियमितपणे कारवाई करण्यात येते.

एप्रिल २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत मोटार वाहन विभागाच्या वायुवेग पथकामार्फत प्रवाशांकडून जादा भाडे आकारणाऱ्या टॅक्सी व रिक्षा चालकांविरुध्द विविध माध्यमाद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नांव | प्राप्त तक्रारी | कारणे दाखवा नोटीस | केलेल्या कारवाईची संख्या | दंड वसुली (रुपये) |
|---|---|---|---|---|
| प्रापका, मुंबई (पश्चिम) | १८ | १८ | ०९ | २८,८००/- |
| प्रापका, मुंबई (पूर्व) | १७ | १७ | १७ | ८६,०००/- |

प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

| एकूण प्राप्त तक्रारी | नोटीस जारी | दंड वसुली (रुपये) |
|---|---|---|
| ८५२ | ६८२ | ३,६०,१००/- |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेंतर्गत मंजूर रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२६) * १८२१४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेंतर्गत रुपये १२ कोटींच्या निधीतून रस्त्यांची कामे मंजूर असतानाही रस्त्यांची कामे पूर्ण झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच रस्त्याची दोन कामे मंजूर करण्यात आल्याने याबाबत श्री.विनोदकुमार जैन यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यांच्या कामांत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

भुसावळ नगरपरिषदेला “विशेष रस्ता योजनेंतर्गत” सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रुपये १२ कोटी व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात शासन रुपये ५ कोटी, असे एकूण रुपये १७ कोटी इतका शासनाने मंजूर केलेला निधी प्राप्त झाला आहे. कार्यादेश देण्यात आलेल्या रुपये ११.०९ कोटींच्या कामांपैकी रुपये ७.०९ कोटी इतक्या रकमेची कामे पूर्ण झाली असून, रुपये ४ कोटी इतक्या रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, भुसावळ शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

(३) जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदाराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते गांधी चौक हा रस्ता पूर्ण करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने भुसावळ नगरपरिषदेच्या सहमतीने या रस्त्याचे काम पूर्ण केले आहे. तसेच शहरातील मंजूर इतर रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना समाजकार्ये महाविद्यालय, जालना येथे प्राचार्यांची बेकायदेशीर नियुक्ती केल्याबाबत

**(२७) * १८२८८ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना समाजकार्ये महाविद्यालय, जालना येथील विद्यमान प्राचार्यांची सन २००९ मध्ये प्राचार्यपदी नियुक्ती करताना U.G.C/शासन निर्णयानुसार अनुभवाची अट १० वर्षे पूर्ण नसतानाही बेकायदेशीरपणे नियुक्ती देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राचार्य पदभरतीच्या जाहिरातीमध्येही १० वर्षे अनुभवाची अट असतानाही सदर अटीचे उल्लंघन करुन प्राचार्यपदी नियुक्ती केलेल्या प्राचार्यांनी नियमबाह्य कामे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राचार्य पदाकरीता अनुभवाची पात्रता पूर्ण करीत नसताना शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन प्राचार्यपदी केलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत तसेच अदा केलेले वेतन व भत्ते वसूल करुन प्राचार्यपदी बेकायदेशीर नियुक्ती करणाऱ्या जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा तोटा भरुन काढण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२८) * १८४०७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे दिवसाचे उत्पन्न रुपये १३ कोटी ५० लाख असून दिवसाचा खर्च रुपये २५ कोटी असल्यामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळ उत्पन्न कमी व खर्च अधिक असल्याकारणाने तोट्यात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा तोटा भरुन काढण्याबाबत तसेच राज्य मार्ग परिवहन महामंडळास नफा मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) रा.प. महामंडळाचे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- रा.प. महामंडळाच्या सर्व मार्गांवर वाहतूक वाढविण्यासाठी सर्व विभाग नियंत्रक यांना वारंवार दृकश्राव्य बैठकीद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- रा.प.महामंडळाच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी कामगार कर्तव्यनिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात येत असून उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.
- चालक-वाहकांसाठी प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्याची प्रक्रिया सुरू आहे.
- रा.प.महामंडळात स्व:मालकीच्या साध्या ७०० बसेस, भाडेतत्वावरील ५०० साध्या बसेस व १५० विद्युत बसेस वाहतूकीकरीता महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. रा.प. महामंडळाच्या ताफ्यात भाडेतत्वावरील ५१५० विद्युत बसेस घेण्याबाबत संचालक मंडळाने मंजुरी दिलेली आहे.
- रा.प. महामंडळाने स्व:मालकीच्या २००० साध्या बसेसकरीता चासिस खरेदीबाबत निविदा प्रक्रिया सुरू आहे.
- राज्य शासनामार्फत वेतनासाठी काही प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
- खर्चात काटकसर करण्याकरीता डिझेल, ऑईल व टायरवरील खर्चाबाबत वेळोवेळी आढावा घेऊन सदरच्या खर्चामध्ये बचत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेतील उपायुक्त पदावर नियमबाह्य नियुक्ती करण्यात आल्याबाबत

**(२९) * १८४१६ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक १४६५८ ला दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमांचे उल्लंघन करुन घनकचरा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाने संगनमताने नियमबाह्य कामे करुन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घनकचरा विभागात स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये विभागप्रमुख प्रतिनियुक्तीच्या धोरणाबाबत शासन निर्णयानुसार आस्थापनेवर ४ वेळा किंवा १० वर्षांहून अधिक कालावधीची प्रतिनियुक्ती देता येत नसतानाही पशुधन विकास अधिकारी यांची उपायुक्त पदावर नवी मुंबई महानगरपालिकेने ३ पेक्षा अधिक वेळा नियमबाह्य प्रतिनियुक्ती केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात लम्पी आजारामुळे हजारो जनावरांचे मृत्यू होत असताना आरोग्य विभागात पशुधन विकास अधिकारी यांची आवश्यकता असतानाही बदलीच्या स्थानी रुजू झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पशुधन विकास अधिकारी यांच्या विरोधात अनेक तक्रारी प्राप्त असूनही त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.बाबासाहेब राजाळे, पशुधन विकास अधिकारी यांचा नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २३/०८/२००५ | दिनांक २१/११/२०११ | ६ वर्ष २ महिने |
| २. | दिनांक ०४/०३/२०१४ | दिनांक १५/०३/२०१६ | २ वर्ष |
| ३. | दिनांक ०९/०७/२०२० पासून | सद्या कार्यरत | २ वर्ष ७ महिने |

(३) व (४) • दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यातील लम्पी चर्मरोगाच्या वाढत्या प्रादुर्भावावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणामध्ये लसीकरण मोहीम राबविणे आवश्यक असल्याने, या परिस्थितीत तांत्रिक मनुष्यबळाची नितांत आवश्यकता असल्याची बाब विचारात घेऊन, डॉ.राजाळे, पशुधन विकास अधिकारी यांची उपायुक्त, नवी मुंबई महानगरपालिका या पदावरील प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली होती.

• तथापि, पुनश्च: दिनांक २०/१०/२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये प्रशासकीय निकड लक्षात घेऊन डॉ.राजाळे यांची उपायुक्त, नवी मुंबई महानगरपालिका या रिक्त पदावरील प्रतिनियुक्ती कायम करण्यात आलेली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: पुणे विभागातील दिव्यांगांना अपंग महामंडळाकडून कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * १७५८३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पुणे विभागातील दिव्यांगांना शासनाच्या अपंग महामंडळाकडून गत तीन वर्षांपासून कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगांसाठी असलेल्या कर्ज योजनेसाठी अपंग महामंडळाकडे व अपंग आयुक्तालयाकडे निधी उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपंग महामंडळाकरीता निधीची तरतूद करुन पुणे विभागातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी व स्वयंरोजगारासाठी दिव्यांगाना अपंग महामंडळातून कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय दिव्यांग वित्त व विकास महामंडळाकडून महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन न दिल्याने राज्य महामंडळाकडे सद्य:स्थितीत सदर कर्ज योजनेसाठी निधी उपलब्ध नाही.

दिव्यांग कल्याण आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल कर्ज योजनेसाठी पुणे विभागासाठी रुपये १७,९७,०००/- इतकी तरतूद वितरित करण्यात आलेली आहे.

(३) कर्जदार लाभार्थ्यांकडून थकीत कर्ज रकमेची परतफेड होत नसल्याने दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत व्याजासहीत रुपये ४४.७४ कोटी एवढी राष्ट्रीय महामंडळास थकीत रक्कम देय आहे. याकरीता रुपये ५० कोटी एवढ्या रकमेची पुरवणी मागणी शासनाकडून हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये मंजूर करण्यात आलेली आहे. सदरचा निधी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील दवाखान्यात कायमस्वरुपी डॉक्टरांची नियुक्ती करुन पुरेसा औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(३१) * १७२५२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात गत अनेक महिन्यांपासून ॲलोपॅथिक डॉक्टर नसल्याने आजारी कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असून तसेच औषधांचा तुटवडा व खोकल्याचे औषध नसल्यामुळे आयुर्वेदिक डॉक्टरामार्फत सर्दी व खोकला असलेल्या आजारी कर्मचाऱ्यांना आयुर्वेदिक काढा देऊन उपचार करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील दवाखान्यात नियुक्ती केलेले डॉक्टर गैरहजर असल्यास दुसऱ्या डॉक्टरांची नियुक्ती करणे आवश्यक असताना याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजारी कर्मचाऱ्यांची तपासणी आयुर्वेदिक डॉक्टरांकडून करण्यात येत असून औषधांचा तुटवडा असल्यामुळे आजारी कर्मचाऱ्यांना एकच दिवसांचा डोस दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने मुख्यालयातील दवाखान्यात कायमस्वरुपी डॉक्टरांची नियुक्ती करुन पुरेसा औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील दवाखान्यात कायमस्वरुपी ॲलोपॅथीक व आयुर्वेदिक डॉक्टर कार्यरत आहेत.

सदर दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी दिनांक ०३/०१/२०२३ ते दिनांक २०/०१/२०२३ या कालावधीत अर्जित रजेवर होत्या. तथापि, सदर रजेच्या कालावधीत वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (दवाखाने) यांनी रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार केले आहेत.

सदर दवाखान्यात किरकोळ आजारासाठी येणाऱ्या रुग्णांना २ ते ३ दिवसांचे तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या दीर्घकालीन आजारासाठी ३० दिवसांचे औषध दिले जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील दवाखान्यात कायमस्वरुपी डॉक्टर उपलब्ध आहेत. तसेच पुरेशा औषधांचा साठा उपलब्ध असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत गृहनिर्माण संस्थांना कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारण्याकरीता आर्थिक सहाय्य करण्याबाबत

**(३२) * १७०४० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानात सन २०१६ मध्ये दोन हजार चौरस मीटरपेक्षा मोठे क्षेत्रफळ असलेल्या तसेच दररोज १०० किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण संस्था, आस्थापना, शासकीय कार्यालये, हॉटेल यांना आपल्या आवारातच कचऱ्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या निवासी संकुलाचे बांधकाम करतांना कचरा विल्हेवाटीचा प्रकल्प उभारण्याची अट बंधनकारक असून अन्यथा अशा सोसायट्यांना बांधकाम परवाना दिला जात नाही, असा नियम करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत साडेतीन हजारांहून अधिक गृहनिर्माण संस्था या कक्षेत येत असून त्यांनी कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणे अपेक्षित असताना गेल्या सहा वर्षात ५० टक्के गृहनिर्माण संस्थांनी कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरेशा निधी अभावी मुंबईतील अनेक गृहनिर्माण संस्थांना कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईत कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारण्याकरीता गृहनिर्माण संस्थांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाच्या घन कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ अंतर्गत दररोज १०० किलो पेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या विविध संस्था, आस्थापना, कार्यालय, इ. यांना आपल्या आवारातच कचऱ्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.

तसेच ५००० चौ.मी. पेक्षा मोठे क्षेत्रफळ असलेल्या मोठ्या आवारातील आस्थापना (गेटेड कम्युनिटी ॲन्ड इंन्स्टीटूशन) यांना आपल्या आवारातच कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाट लावणे बंधनकारक केले आहे. तथापि, २००० चौ.मी. पेक्षा मोठे क्षेत्रफळ असलेल्या आस्थापनांना आपल्या आवारातच कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाट लावणे बंधनकारक नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या अमान्यतेच्या सूचना (आयओडी) मध्ये, ओल्या कचऱ्याच्या विघटनासाठी कचरा विल्हेवाट प्रकल्पाची तरतूद करण्याची अट समाविष्ट करण्यात येते. सदर अटीच्या पुर्ततेची खातरजमा केल्यानंतर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्याने संकलित केलेल्या माहितीनुसार सद्य:स्थितीत एकूण २८२५ गृहनिर्माण संस्था या दररोज १०० किलो पेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांच्या कक्षेत येत आहेत. त्यापैकी १४२४ गृहनिर्माण संस्थानी कचऱ्यावर प्रक्रिया व विल्हेवाट करण्याकरीता यंत्रणा उभारली आहे.

(४) व (५) घन कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ अन्वये गृहनिर्माण संस्थांमध्ये कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारण्याची जबाबदारी ही संबंधित गृहनिर्माण संस्थेची आहे. त्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांना कोणतेही अनुदान देण्यात येत नाही. परंतु, सुख्या कचऱ्याचे वर्गीकरण करणाऱ्या आणि ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातील सर्वसाधारण करामध्ये प्रत्येकी ५ टक्के सूट देण्याची तदतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-भंडारा महामार्गावरील शिवशाही बसेसच्या स्पॉट बुकिंगमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३३) * १८१२२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-भंडारा महामार्गावरील शिवशाही बसेसच्या स्पॉट बुकिंगमध्ये लाखो रुपयांची अनियमितता झाल्याप्रकरणी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवरील कारवाई प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांकडून संपूर्ण प्रवासाचे भाडे वसूल करुन प्रवाशांना विविध सवलतीच्या नावाखाली शुन्य पैशांचे तिकीट देऊन राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि शासनाची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई न करता नागपूर-भंडारा मार्गावरील शिवशाही बसेसच्या बुकिंगचे कंत्राट मिळालेल्या ट्रायमॅक्स कंपनीला संरक्षण देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नागपूर-भंडारा मार्गावरील शिवशाही बसेसच्या स्पॉट बुकिंगची दक्षता अधिकाऱ्यांकडून सुरु असलेल्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी रा.प. महामंडळाकडुन चौकशी केली असता चौकशीअंती मे.ट्रायमॅक्स या कंपनीला जबाबदार धरण्यात आलेले आहे. तसेच एच बी टाऊन पारडी नागपूर येथील ट्रायमॅक्स कंपनीचे स्पॉट बुकींग एजंट यांचेवर मौदा पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र. ०६६० दिनांक ११/१०/२०२२ नुसार भादंवि १८६० कलम ४०९ अन्वये व भंडारा पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र.०६०० दिनांक २८/११/२०२२ नुसार भादंवि १८६० कलम ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रकरणी नुकसान भरपाई पोटी मे.ट्रायमॅक्स कंपनीकडून रुपये ५,०१,४१०/- वसुली रक्कम व रुपये १ लाखांचा दंड असे एकूण रुपये ६,०१,४१०/- (सहा लाख एक हजार चारशे दहा रुपये मात्र) ठोठावण्यात आले आहे.

तसेच सदर प्रकरणाची चौकशी करून, वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प. नागपूर यांनी दिनांक ३०/११/२०२२ रोजी रा.प. महामंडळास अहवाल क्र.२६७ सादर केला आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(३४) * १७३६६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील केंद्र शासनाच्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्तीची ७ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) चालू शैक्षणिक वर्षाकरीताचे काही अभ्यासक्रमांची राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क समितीमार्फत शिक्षण शुल्क निश्चिती प्रक्रियेस विलंब झालेला असल्याने, व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेश प्रक्रिया माहे डिसेंबर २०२२ च्या अखेरपर्यंत चालू राहिल्याने तसेच विद्यार्थी अथवा महाविद्यालयाच्या संबंधित बँक खात्याचे आधार संलग्निकृत प्रक्रिया प्रलंबित असल्याने काही प्रमाणात शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आलेली होती.

(३) विलंबाच्या बाबी निदर्शनास येताच संबंधित सक्षम शैक्षणिक विभाग (उदा. उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, शिक्षण शुल्क समिती, राज्यातील सर्व विद्यापीठे इ.) यांना समाज कल्याण आयुक्तालयामार्फत चालू शैक्षणिक वर्षातील शिक्षण शुल्क, इतर शुल्क तात्काळ मंजूर करुन महाडीबीटी पोर्टलमध्ये अद्ययावत करुन देण्याबाबतच्या सूचना देखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांमार्फत ऑनलाईन अर्ज नोंदणी व संबंधित महाविद्यालयांकडून करण्यात

येणारी ऑनलाईन अर्ज तपासणी व पडताळणी या प्रक्रियेस अधिक गती येण्याकरीता विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयांकडून वेळोवेळी महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठका, विद्यार्थी पालक संघटनांची व्हिडीओ कॉन्फरन्स, महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे लाभाचे वितरण विहित वेळेत व अचूक लाभार्थ्यांला लाभ मिळण्याच्या दृष्टिकोनातून लाभार्थ्यांच्या आधार संलग्निकृत बँक खात्यात अदा करण्याच्या दृष्टिकोनातून संबंधित विद्यार्थी/त्यांचे पालक, महाविद्यालये व जिल्ह्यातील विद्यार्थी पालक संघटना यांना देखील विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार संलंग्निकृत करुन घेणेबाबत जाहीर आवाहन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत

**(३५)** * **१७६२८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहा सदस्यांच्या पदांपैकी तीन सदस्यांची पदे रिक्त असल्यामुळे शासकीय विभागातील विविध पदांसाठीच्या ५ हजार पेक्षा अधिक मुलाखती रखडल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा अन्य निवड समित्यांकडे सदोष मागणी पत्र पाठवल्याने दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत प्रसिध्द न होणाऱ्या जाहिरातींची परीक्षा कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना देता येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील रिक्त पदांवरील सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत, वयोमर्यादेची अट शिथिल करण्याबाबत तसेच पदभरती प्रक्रिया जलदगतीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये १ अध्यक्ष व ५ सदस्य एकूण ६ सदस्य अशी रचना असून सदस्यांच्या ३ रिक्त पदांवर माहे २० जानेवारी, २०२३ मध्ये २ सदस्यांची व १ मार्च, २०२३ रोजी १ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची सर्व रिक्त पदे शासनाकडून भरण्यात आली असल्याने उपलब्ध यंत्रणेचा पर्याप्त वापर करुन भरती प्रक्रिया गतीमान झाली आहे.

कोरोना कालावधीत पदभरतीच्या जाहिराती प्रसिध्द न झाल्याच्या पार्श्वभूमीवर या कालावधीत वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना परिक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून दिनांक १७/१२/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२२ या कालावधीत प्रसिध्द होणाऱ्या

जाहिरातींच्या अनुषंगाने परिक्षेला बसण्याची मुभा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १७/१२/२०२१ अन्वये देण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ व उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नदी/खाड्यांमध्ये प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३६) * १८३५४ श्री.जयंत पाटील, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरात दररोज २६८ एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यातील ८० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया होऊन उर्वरित प्रदूषित सांडपाणी प्रक्रिया न होता थेट जलस्त्रोतांमध्ये/नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याचे तसेच अंबरनाथ व उल्हासनगर शहरातील रासायनिक कारखान्यांतून वालधुनी आणि उल्हास नदीमध्ये घातक रसायनयुक्त सांडपाणी सोडल्यामुळे सदरहू नद्यांना गटाराचे स्वरुप प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विविध कारखाने, रासायनिक कंपन्या तसेच अन्य ठिकाणांहून दररोज एकूण ८१९ कोटी लिटर सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यातील केवळ २५ टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया होऊन उर्वरित ७५ टक्के प्रदूषित सांडपाण्यांवर प्रक्रिया न होता थेट जलस्त्रोतांमध्ये/ नद्यांमध्ये सोडण्यात येत असून केंदीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२९ च्या अहवालात राज्यातील ४५ नद्या प्रदूषित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या अहवालानुसार राज्यातील कोणकोणत्या नद्या प्रदूषित झाल्याचे निदर्शनास आले आहेत,
(४) असल्यास, प्रक्रियाविना प्रदूषित सांडपाणी जलस्त्रोतांमध्ये/नद्यांमध्ये सोडल्यामुळे जलजीवांसह नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असून शासनाच्या विविध योजनांद्वारे कोट्यवधी रुपये खर्च करून मलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील जलस्त्रोतांमध्ये/नद्यांमध्ये/खाड्यांमध्ये प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करुन राज्यात मलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) • महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कोणत्याही रासायनिक उद्योगास/ कारखान्यास नदीमध्ये अप्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्याची परवानगी दिली जात नाही.
• केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा २०१९ चा अहवाल २०१७ - २०१८ च्या अहवालावरून तयार केलेला आहे. सदर अहवालामध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ५३ नद्यांचे पट्टे प्रदूषित असल्याचे नमूद केलेले आहे.

(४) • उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार दूषित पाणी आढळून आल्यास सदर पाणी स्त्रोतांचे योग्य प्रकारे शुध्दीकरण/ उपाययोजना करुन सदर पाणी नमुने पुनर्तपासणीअंती पिण्यास योग्य असल्याची खात्री करुन पाणी पिण्यास वापरण्याबाबतच्या सूचना दिल्या असून पाणी शुध्दीकरण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे.

• सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सांडपाण्यामुळे जनावरांच्या त्वचेवर होणाऱ्या परिणामाबाबत कोणतीही बाब आढळून आली नसल्याचे कळविले आहे.

• मलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याचे काम सुरु असून ते मार्च, २०२३ पूर्ण होण्याचे प्रस्तावित आहे.

(५) • महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांना दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तीची पालन करणे बंधनकारक असून सदर नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित आदेश व बंदचे आदेश दिले जातात.

• स्थानिक स्वराज्य संस्थांना मलशुध्दीकरण प्रकल्प वेळेत उभारण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी आदेश दिलेले असून, वेळेत घरगुती सांडपाणी प्रकल्प उभारण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) * १७८४३ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील अजनी रेल्वे पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(३८) * १७३०० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील १२६ वर्षे जुना असलेल्या अजनी रेल्वे पूलाची दुरवस्था झाली असून या ठिकाणी नवीन पूल (ROB) बांधण्याकरीता शासनाने कार्यवाही सुरु केली असून सदर पूल (ROB) निर्माण करतांना रेल्वे तसेच नागपूर महानगरपालिका व अन्य संबंधित शासकीय विभागांची पूर्वपरवानगी राज्य शासनाने घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे (ROB) चे डिझाईन तयार करताना सद्य:स्थितीत पुलालगत असलेले दुकानांचे संकुल मोठ्या प्रमाणात असून या परवानाधारक दुकानदारांना विश्वासात घेऊन सदरहू योजना राबविण्याबाबत येणार आहे काय,

(३) तसेच येथील परवानाधारक दुकानदारांच्या मागणीनुसार अजनी (ROB) चे डिझाईन मध्ये बदल (चेंज) करुन व्यवसायिकांच्या दृष्टिकोनातून उपयोगी असणारे धोरण अवलंबून सदरहू पूल बांधण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरातील अजनी रेल्वेचा नवीन पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरातील अजनी (ROB) रेल्वे उड्डाणपूलाचे बांधकाम सन १९२३ मध्ये करण्यात आले असून सदर पुलाचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. या ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून सदर उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचेकडून करण्यात येत आहे. या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी रेल्वे, नागपूर महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राथमिक मान्यता दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्राप्त झाली असून बांधकामाच्या पुढील टप्प्यावरील मंजूरीबाबतची प्रक्रिया महारेलकडून सुरु आहे.

(२) व (३) सदर पूल ट्विन केबल स्टेड पूल आहे आणि अशाप्रकारे डिझाईन करुन बांधला जात आहे की, रेल्वेलाईन मध्ये फक्त एकच खांब राहील. हा पूल विद्यमान रस्ता वाहतूकीला अडथळा न देता व वाहतुकीला न थांबविता बांधला जाईल. रेल्वे किंवा नागपूर महानगरपालिकेच्या जागेत कोणतेही अतिक्रमण असल्यास आणि पुलाच्या बांधकामासाठी अतिक्रमण काढण्याची आवश्यकता असल्यास, या क्षतिग्रस्त पुलाच्या पुनर्बांधणीसाठी सदर अतिक्रमण काढण्यात येईल. तथापि, दुकानदारांना त्रास किंवा गैरसोय कमी करण्यासाठी काळजी घेण्यात येत आहे.

(४) व (५) आठपदरी अजनी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याबाबत नागपूर महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या रुपये १७८.१६ कोटी रक्कमेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अजनी रेल्वे उड्डाणापूलाच्या बांधकामाचा खर्च रेल्वे प्रशासनाने करावा आणि अजनी रेल्वे रुळावरील मुख्य पुलाला जोडणारी इतर अनुषंगीक पूल व मार्गीका/रस्ता (Road Alignment) यांचे काम करण्याच्या अनुषंगाने निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत दिनांक १६/०२/२०२३ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

-----------------

## गणपत पाटील नगर, दहिसर (मुंबई) झोपडपट्टीतील नागरिकांना महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * १८२६३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गणपत पाटील नगर, दहिसर (मुंबई) या झोपडपट्टीतील नागरिकांना महानगरपालिकेकडून पिण्याच्या पाण्याची व प्राथमिक सुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना पिण्याचे पाणी व प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) गणपत पाटील नगर, दहिसर (पश्चिम) ही खाजगी जमिनीवर वसलेली झोपडपट्टी सदृश वसाहत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "सर्वांसाठी पाणी" या धोरणांनुसार सदर लोकवस्तीस महानगरपालिकेमार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत माहे जानेवारी २०२३ पर्यंत एकूण ११५७ जलजोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच अर्ज प्राप्त झाल्यास जलजोडणी देण्याची कार्यवाही करण्यात येते.

गणपत पाटील नगर परिसरात रोगराई पसरु नये म्हणून महानगरपालिकेमार्फत नागरीकांचे लसीकरण शिबिर आयोजित केली जातात. तसेच लहान मुलांना जंताचे व विटॅमीन ए ची औषधे देण्यात येतात. गणपत पाटील नगर परिसरातील घरोघरी जाऊन आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम आरोग्य खात्यामार्फत राबविले जातात.

गणपत पाटील नगर येथे महानगरपालिकेमार्फत साफसफाई धुम्र फवारणी, किटकनाशक फवारणी इत्यादी प्राथमिक सुविधा पुरविण्यात येतात. तसेच महानगरपालिकेमार्फत गणपत पाटील नगर गल्ली नंबर-१४ च्या बाहेर लिंक रोड लगत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ६० आसनी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राच्या 'डी' प्रभागाच्या कार्यालयातून मुलांच्या शिक्षणासाठी जातीच्या दाखल्याचा चौकशी अहवाल मिळत नसल्याबाबत

**(४०) * १७०७५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राच्या "डी" प्रभागाच्या कार्यालयात मुलांच्या शिक्षणासाठी ६५ जातीच्या दाखल्यांची प्रकरणे गृह विभागाच्या चौकशीसाठी दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दाखल करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या "डी" प्रभागाच्या कार्यालयातून जातीच्या दाखल्यांचा गृह विभागाच्या चौकशीचा अहवाल मिळत नसल्याने मुलांच्या शिक्षणामध्ये अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गृह विभागाचा चौकशीचा अहवाल घेण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेच्या कार्यालयावर पालघर जिल्ह्यातील काही संस्थांनी शाळेतील विद्यार्थ्यांसह दिनांक ४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सत्याग्रह आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गृह विभागाचा चौकशी अहवाल देण्यास विलंब लावणाऱ्या दोषींवर कारवाई करुन वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राच्या "डी" प्रभागाच्या कार्यालयातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ६५ जातीच्या दाखल्यांचा गृह विभागाचा चौकशी अहवाल शालेय विद्यार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०९/२०२२ रोजी ३२ अर्ज व दिनांक ३०/०९/२०२२ रोजी ३३ अर्ज प्राप्त झाले होते.

(२), (३) व (४) श्रमजीवी संघटनेमार्फत सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती "डी" यांचे कार्यालयासमोर दिनांक ०४/११/२०२२ रोजी आंदोलन करण्यात आले होते.

त्यानुषंगाने उप विभागीय अधिकारी, वसई यांनी दिनांक १३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमातीचे ६५ दाखले सेतू सुविधा केंद्र, वसई यांचेकडे प्राप्त झाल्याचे कळविले आहे. त्यापैकी ३८ दाखले हे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन निर्गमित केल्याचे कळविले. तसेच १४ जातीचे दाखले हे कातकरी समाजाचे असल्याने सदरचे दाखले हे आदिवासी प्रकल्प अधिकारी, डहाणू यांचेकडे वर्ग करण्यात आले असून उर्वरित १३ दाखले हे तत्सम पुरावे/ कागदपत्रे संबंधित अर्जदारांनी उपलब्ध करुन दिले नसल्याने त्रुटी अभावी प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. संबंधित दाखल्याचे पूर्तता अहवाल प्राप्त होताच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन वितरित करण्यात येईल, असे वसई-विरार महानगरपालिका यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वक्फ बोर्डाच्या कामकाजाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१)** * **१८०७१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाच्या कामकाजाची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची मागणी हिंदू विधीज्ञ परिषद यांनी मा.अल्पसंख्यांक मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाच्या कामकाजाच्या नोंदी, प्राप्त होणारे निधी तसेच वक्फ बोर्डाच्या नावे मुंबई व राज्यात इतरत्र नोंद असलेल्या ७७ हजार एकर जमिनीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती उपलब्ध होत नसल्याने यामध्ये अनियमितता होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबतची माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वक्फ बोर्डाच्या जमिनीमध्ये अनियमितता करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन वक्फ बोर्डाच्या कामकाजाची व बोर्डाच्या ताब्यात असलेल्या जमिनींबाबतचा तपशील तसेच इतर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने घेतलेल्या निर्णयांची/ठरावांची माहिती महाराष्ट्र वक्फ मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच वक्फ मंडळाने पारित केलेल्या आदेशाच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत अर्जदारांनी मागणी केल्यास वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार प्रमाणित प्रती संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच वक्फ मालमत्तासंदर्भात वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्वेक्षणांची यादी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने वेळोवेळी राजपत्रामध्ये प्रसिध्द केल्या असून सदर राजपत्रांच्या प्रती वक्फ मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील महा ई-सेवा केंद्रामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४२) * १७८४९ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महा ई-सेवा केंद्रांच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने, अनुज्ञाप्ती आणि इतर सेवा प्रदान केल्या जात असून ७/१२ चा उतारा, रहिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र अशी अनेक उपयुक्त कागदपत्रे महा ई-सेवा केंद्रांच्या माध्यमातून नागरिक प्राप्त करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महा ई-सेवा केंद्रांच्या माध्यमातून आवश्यक प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज भरून उपलब्ध होत असून पुणे जिल्ह्यातील महा ई-सेवा केंद्र वितरणात सदरहू सेवा पुरविताना झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्यात येऊन कारवाई करण्याबाबतची मागणी श्री.सुधीर अशोक ताकतोडे, दौंड (जि.पुणे) यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महा ई-सेवा केंद्रात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

महा ई-सेवा केंद्रांच्या (आपले सरकार सेवा केंद्र) माध्यमातून विविध शासकीय सेवा नागरिकांना पुरविण्यात येतात.

(२) अंशत: खरे आहे.

श्री.सुधीर अशोक ताकतोडे यांचा अर्ज दिनांक २४/०२/२०२३ रोजी मा.महसूल मंत्री यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झाला असून सदर अर्ज पुढील उचित कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांना अग्रेषित करण्यात आला.

(३) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक २४/०२/२०२३ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली. चौकशी समितीने महा ई-सेवा केंद्रासाठी पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता सदर समितीस दौंड तालुक्यातील राहू या गावासाठी श्री.महेंद्र खोरकर यांना वाटप करण्यात आलेल्या महा ई-सेवा केंद्रासाठी (आपले सरकार सेवा केंद्र) त्यांनी योग्य कागदपत्रे सादर केली नसल्याचे आढळून आले. सबब, चौकशी समितीने श्री.महेंद्र खोरकर यांचा अर्ज अपात्र करुन त्यांना वाटप करण्यात आलेले मौजे राहू येथील महा ई-सेवा केंद्र (आपले सरकार सेवा केंद्र) रद्द केले. तसेच, ज्या तपासणी पथकाकडून श्री.महेंद्र खोरकर यांना पात्र उमेदवार म्हणून ठरविले गेले, त्या पथकातील सदस्यांना जिल्हाधिकारी, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस अन्वये खुलासा सादर करण्यास सांगितले असून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून संबंधित सदस्यांवर पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मा.महसूल मंत्री यांच्या कार्यालयाकडून दिनांक २४/०२/२०२३ रोजी अर्ज प्राप्त होताच तात्काळ चौकशी समिती गठीत करुन जिल्हाधिकारी, पुणे यांनी तात्काळ कार्यवाही पूर्ण केली आहे.

-----------------

## कार्ला (जि.पुणे) येथील श्री एकविरा देवी मंदिर येथे फनिक्युलर ट्रॉली निर्माण करण्याचा प्रस्तावाबाबत

**(४३)** * **१७४९१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्ला (जि.पुणे) येथील श्री एकवीरा देवी मंदिर व परिसराचा विकास व संरक्षण करण्याच्या दृष्टीने श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर ट्रॉली निर्माण करण्याचा प्रस्ताव पर्यटन विभागाकडे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री एकवीरा देवी मंदिर पायथ्याशी पर्यटकांच्या सोयी सुविधेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वच्छतागृह व उपहारगृह उपलब्ध करुन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री एकवीरा देवी मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रुपये ३९.४३ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री एकवीरा देवी मंदिर येथे पर्यटन विभागाकडे विचाराधीन असलेला फनिक्युलर ट्रॉली निर्माण करण्याचा प्रस्तावाबाबत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

कार्ला (जि.पुणे) येथील श्री एकवीरा देवी मंदिर व परिसराचा विकास व संरक्षण करण्याच्या दृष्टीने श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर ट्रॉली निर्माण करण्याचा प्रस्ताव पर्यटन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पर्यायाने दिनांक १७/१२/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतर केलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

एकविरा देवी मंदिर पायथ्याशी जनसुविधा केंद्र उभारले असून त्यामध्ये उपहारगृह आणि स्वच्छतागृह कार्यरत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदरचा प्रकल्प पर्यटन संचालनाकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळकडे दिनांक १७/१२/२०२२ रोजी वर्ग करण्यात आला असून प्रकल्पाचा सुधारित अहवाल/ प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत

**(४४) * १७१०२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुख्य लेखा परीक्षक खात्याकडून वरिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या अहर्ताकारी परीक्षेचा निकाल चार वर्षांहून अधिक कालावधी होऊनही जाहीर न झाल्याने कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी परीक्षेची कार्यवाही थांबविण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदासाठी आणि कालबध्द पदोन्नतीसाठीही अहर्ताकारी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असल्याने अनेक कर्मचारी गत चार वर्षांत पदोन्नती न मिळाल्याने कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरुन निवृत्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कर्मचाऱ्यांना अहर्ताकारी परीक्षा पास होण्याची अट कायमस्वरुपी शिथिल करुन सर्व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) राज्य शासनाच्या धर्तीवर दिनांक २४/०७/२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीची योजना दिनांक ०७/०७/२००५ पासून लागू करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार कालबध्द पदोन्नतीसाठी पदोन्नतीच्या सर्व निकषांची पूर्तता होणे बंधनकारक आहे. तथापि, स्थायी समितीच्या दिनांक १६/०८/२०१६ रोजीच्या ठरावानुसार संधी न मिळालेल्या कर्मचाऱ्यांना परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ मंजूर केले असून, ठरावाच्या दिनांकापासून कालबध्द पदोन्नतीचे लाभ देण्यात आले आहेत.

तसेच, अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटींची पूर्तता न केल्याने चार वर्षांत कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदावरुन कर्मचारी कार्यात्मक पदोन्नतीशिवाय सेवानिवृत्त होत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तत्कालिन अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार, वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाच्या पदोन्नतीतील अनियमिततांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्य लेखापरीक्षक जबाबदार आहेत. त्यानुसार सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ७८अ (१)(ड) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ मधील नियम क्र. १५ नुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १७/०१/२०२३ रोजीच्या पत्रानुसार शासनाच्या वित्त विभागास कळविले आहे.

तसेच, सेवा प्रवेश नियमांनुसार वरिष्ठ लेखा परीक्षक सहाय्यक पदावरील नियमित पदोन्नतीसाठी खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण असणे ही अर्हता सद्य:स्थितीत कायम आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड (जि.परभणी) नगरपरिषदेच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत

**(४५)** * **१८३०६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) नगरपरिषदेतील विविध प्रभागांमध्ये सिमेंट रोड, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक तसेच डांबरीकरणाचे काम करण्यासाठी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असून तसेच विशेष अनुदानांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते दिलकश चौक मुख्य मार्गावर सी.सी. नाली, रस्ता व फुटपाथ करणे इ. कामासाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी शासनाच्या महाटेंडर या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही निविदा समितीने तसेच अध्यक्ष, गंगाखेड नगरपरिषद व मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपरिषद यांच्या समितीने मे.पल्लवी कन्स्ट्रक्शन यांची नावे अंतिम करुन सदर दोन्ही कामांसाठी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपरिषद यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजी शुध्दीपत्रक काढून तांत्रिक कारणास्तव व त्यांना कोणताही अधिकार नसताना पदाचा गैरवापर करुन दोन्ही निविदा व कार्यारंभ आदेश रद्द केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपरिषद यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) गंगाखेड नगरपरिषदेतील विविध प्रभागामध्ये सिमेंट रोड, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक तसेच डांबरीकरणाचे काम वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत करण्यासाठीची निविदा दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक २३ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत महाटेंडर या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

तसेच वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष योजनेंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते दिलकश चौक या मुख्य मार्गावर सी.सी. नाली, रस्ता व फुटपाथ करणे इ. कामासाठीची निविदा दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ (तिसरी वेळ) या कालावधीत महाटेंडर या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) नायब तहसिलदार, गंगाखेड तथा तत्कालीन प्रभारी मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपरिषद यांनी त्यांना कोणताही अधिकार नसताना, दोन्ही कामाचे आदेश रद्द केल्याप्रकरणी त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली. विभागीय चौकशीअंती त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ५(१)(चार) नुसार पुढील वार्षिक वेतनवाढ, भावी काळातील वेतनवाढीवर परिणाम करुन दोन वर्षाकरीता कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील जांबरुंग धरण प्रकल्पाची कामे रखडल्याबाबत

**(४६) * १७९६१ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील रेल्वे लाईन पट्ट्यातील नावंढे, केळवली, वांगणी, वणी, बीड, जांबरुंग, खरवई, डोलवली इ. १५ गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी दूर होण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी, १९८० रोजी जांबरुंग धरण बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून या धरणामुळे परिसरातील १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९८० मध्ये जांबरुंग धरणासाठी शासनाने मंजुरी देऊन त्यावेळी रुपये ४९ लाख २० हजारांची आर्थिक तरतूद शासनाने केली होती, परंतु, धरण प्रकल्प योजना ४२ वर्षे रखडल्याने त्याचा खर्च रुपये ६० कोटी पर्यंत गेला असून शासनाच्या तिजोरीवर ९० पटीने भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४२ वर्षे उलटूनही धरणाचे काम सुरु न झाल्याने १५ गावांना उन्हाळयात पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून शेतजमिनी, पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दोन वर्षांपूर्वी सदर धरण प्रकल्प योजनेतील कामांसाठी नव्याने रुपये ४८ कोटींचा प्रस्ताव मंजूर केल्याची माहिती पाटबंधारे खात्याकडून देण्यात आली असूनही अद्याप कामाला सुरुवात केली नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त धरणाचे काम कधीपर्यंत पूर्ण होईल तसेच सदर कामास उशिर करणाऱ्या अधिकारी व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

या योजनेस रुपये ५९.२१ लक्ष इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता पाटबंधारे विभागाकडून दिनांक ०२/०२/१९८० रोजी प्राप्त झालेली असून सदर योजना या विभागास डिसेंबर,१९९३ रोजी हस्तांतरीत झालेली आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर योजनेस मूळ प्रशासकीय मान्यता रुपये ५९.२१ लक्ष दिनांक ०२/०२/१९८० रोजी प्राप्त झालेली असून सदर प्रकल्पास वनसंज्ञा लागू होती. सदर योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांच्याकडून सन २०११ मध्ये रुपये १८३५.५५ लक्ष इतक्या रकमेस सुप्रमा झालेली आहे. वनजमिनीचे रुपये ३४५.२१ लक्ष वन विभागास हस्तांतरीत केले असून वन जमिनीचा ताबा दिनांक २२/०५/२०१९ रोजी मिळाला आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेचे काम प्रगतीत आहे.
(५) चौकशीच्या अनुषंगाने प्रश्न उद्‌भवत नाही. सदर योजनेच्या संकल्पनास सक्षम स्तरावर मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेऊन निधी उपलब्धतेनुसार सदर प्रकल्प पुढील चार वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी पूर्व व कुर्ला रोड परिसरातील सुशोभिकरणाच्या कामात निधीचा अपव्यय केल्याबाबत

**(४७) * १८०८७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्ते, पदपथ, उद्याने, उड्डाणपूल यांसह विविध प्रकारची ५०० कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून अंधेरी पूर्व व कुर्ला रोड परिसरातील सुशोभिकरणाच्या कामात रुस्तमजी सेंट्रल पार्क, चकाला, अंधेरी पूर्व येथे पदपथाच्या चांगल्या दर्जाच्या टाईल्स तोडून सुशोभिकरण केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुशोभिकरणाच्या कामात चांगल्या दर्जाच्या टाईल्स तोडून अनावश्यक निधी खर्च केल्याप्रकरणी वॉचडॉग फाऊंडेशन तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील अंधेरी पूर्व व कुर्ला रोड परिसरातील सुशोभिकरणाच्या कामात पदपथावरील चांगल्या दर्जाच्या टाईल्स तोडून निधीचा अपव्यय केल्याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर काम हे मुंबई सुशोभिकरण प्रकल्पाच्या अंतर्गत येत नाही. सदर कामाचे स्वरुप मे.वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट या विश्वविख्यात संस्थेने सर्वांगीण अभ्यास करुन सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे अंधेरी-घाटकोपर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करणे, पादचाऱ्यांच्या सोयीकरीता पदपथ रुंदीकरण करणे, दुभाजकामध्ये शोभेची/ फुलझाडांची लागवड करणे, रुंदीकरण केलेल्या पदपथावर झाडे लावणे इत्यादी स्वरुपाचे आहे.

सदर काम करताना पदपथावरील चांगल्या दर्जाच्या टाईल्स तोडण्यात आलेल्या नाहीत.
(२) अशा आशयाची लेखी तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस अद्यापि प्राप्त झालेली नाही. तथापि, सामाजिक माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे वेळोवेळी निरसन करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर काम हे जिल्हा नियोजन समितीने सुचविल्याप्रमाणे उपलब्ध निधीतून करण्यात येत आहे. तसेच सदर निधीचा कोणत्याही प्रकारे अपव्यय झालेला नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पश्चिम उपनगरातील नाल्यांच्या डागडुजीसाठीच्या खर्चाच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करण्याबाबत

**(४८) * १८३४२ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील पडझड झालेल्या नाल्यांच्या डागडुजीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने रुपये ५६ कोटी खर्च करण्याचा निर्णय घेतला असून सदरहू कामांसाठी करोडो रुपयांचा अधिकचा खर्च करुन निधीचा अपव्यय करण्यात येत असल्याची तक्रार राजकीय पक्षांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम उपनगरातील वांद्रे, खार, सांताक्रुज, विलेपार्ले, अंधेरी, गोरेगांव, मालाड, कांदिवली, बोरीवली, दहिसर इत्यादी भागातील पडझड झालेल्या नाल्यांच्या जीर्ण झालेल्या कलव्हर्टचे नव्याने बांधकाम करण्यात येणार असून यासाठी रुपये २ कोटी २७ लाख एवढा खर्च करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कलव्हर्टचे बांधकामाकरीता रुपये १५ कोटी ३१ लाख ६५ हजार खर्च होणार असून त्याकरीता कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात येणार असल्यामुळे केवळ नाल्यांच्या डागडुजीसाठी रुपये ५६ कोटी खर्च करण्यात येत असल्यामुळे सदरहू प्रस्तावाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी सर्वच राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील पश्चिम उपनगरातील पडझड झालेल्या नाल्यांच्या डागडुजीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम उपनगरातील तीन क्षेत्रिय विभागातील तसेच वांद्रे (पश्चिम) येथील नॉर्थ एव्हेन्यू रोडवरील जीर्ण झालेल्या कलव्हर्टच्या नव्याने बांधकाम करण्याकरीता अनुक्रमे अंदाजे रुपये ४५ कोटी व रुपये १.७० कोटी इतक्या रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम उपनगरातील नाल्यांच्या डागडुजीकरीता कोणताही प्रस्ताव प्रस्तावित नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे कॉरिडॉर उभारुन पर्यटनाला चालना देण्याबाबत

**(४९) * १८४०८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे केंद्र शासनाकडून कॉरिडॉर प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी पंढरपूरचा नवीन विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, तसेच मध्य प्रदेशातील उज्जैन येथे महाकाल कॉरिडॉर प्रकल्प मार्गी लागले आहेत, त्याच धर्तीवर पंढरपूरचा विकास करण्यासाठी कॉरिडॉर करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, पंढरपूरचा विकास करण्यासाठी कॉरिडॉर प्रकल्प उभारताना येथील ऐतिहासिक वास्तू, मठ आणि मंदिरे बाधित होणार नाहीत याची काळजी घेण्यासह वंचित होणाऱ्या व्यापाऱ्यांची दुकाने तसेच रहिवाशांना न्याय देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून अशा सूचना नगरपरिषदेस प्राप्त नाहीत.

तथापि, पंढरपूर जि.सोलापूर येथे मंदिराजवळ कॉरिडॉर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पंढरपूर येथे भाविकांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भाविकांना चांगल्याप्रकारे पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी व पंढरपूर शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पंढरपूर येथे मंदिर व परिसर विकास व सुशोभिकरण दर्शन बारी सुधारणा, रस्ते विकास, पार्किंग व्यवस्था, उद्यान विकास सुधारणा, घाट बांधकाम, शौचालय व्यवस्था, विद्युत व्यवस्था सुधारणा, पाणीपुरवठा व मलनिसारण व्यवस्था वाढ व सुधारणा इ. कामे प्रस्तावित असून सदर कामी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत गर्दी व्यवस्थापन, मंदिर परिसराचा विकास आणि त्यास भव्य स्वरुप देण्यासाठी वाराणसीच्या धर्तीवर पंढरपूर शहरात कॉरिडॉरची निर्मिती तसेच इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित असून अद्याप आराखडा अंतिम करण्यात आलेला नाही. नागरी व वारकरी संप्रदायाशी चर्चा करुन आराखडा अंतिम करावयाची कार्यवाही सुरु आहे. कॉरिडॉर हा त्या आराखड्याचाच एक भाग असणार आहे.

(३) होय, हे खरे आहे.

यात्रा कालावधीत श्रींच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात लाखो भाविक येत असतात. अशावेळी आपत्कालीन व्यवस्थापन आणि गर्दी व्यवस्थापन करणे ही अत्यंत आवाहनात्मक परिस्थिती बनते. पोलीस प्रशासनाला एकेरी मार्ग सारख्या गोष्टींद्वारे गर्दीचे व्यवस्थापन करणे अशक्य होते. त्यामुळे गर्दीतून चेंगराचेंगरी होऊन एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मंदिर परिसरातील भागात काशी विश्वनाथ, उज्जैनच्या धर्तीवर कॉरिडॉरचा नियोजित प्रारुप आराखडा प्रस्तावित आहे.

(४) पंढरपूरचा विकास करणेसाठी कॉरिडॉर प्रकल्प उभारताना कमीत कमी ऐतिहासिक वास्तु आणि मंदिरे बाधित होतील याचे नियोजन प्रस्तावित असून आराखडा अंतिम करताना या बाबीचा विचार करण्यात येईल.

(५) विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अमरावती जिल्ह्यांसह अन्य जिल्ह्यांतील आगारांकरीता नवीन पर्यावरण पूरक बसेस खरेदी करण्याबाबत

**(५०) * १७०६० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण पोटे-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५४५८ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात १५ हजार ६०० बसेस असून त्यातील दहा वर्षे पूर्ण झालेल्या सुमारे ८४५३ बसेस कार्यरत असून जुन्या झालेल्या बसेसमधून प्रवाशांची वाहतूक सुरु असल्याने प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अमरावती जिल्ह्यातील बस आगारामध्ये नादुरुस्त व भंगार बसगाड्या कार्यरत असल्यामुळे मेळघाट, परतवाडा, चांदूरबाजार याठिकाणी प्रवास करणाऱ्या कर्मचारी व प्रवाशांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२-२०२३ करीता २००० नवीन वाहने खरेदीची निविदा प्रक्रिया सुरु झाली असून राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन १५० इलेक्ट्रीक बसेस व ५०० साध्या बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला असल्याने त्यानुसार राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात किती बसेस दाखल झाल्या आहेत,
(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५१५० इलेक्ट्रीक बसेस भाडेतत्वावरील घेण्याबाबत संचालक मंडळाने मंजुरी दिली असून सदर बसेसकरीता निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील बस आगारासह राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात प्रवाशांच्या सेवेसाठी नवीन पर्यावरण पूरक बसेस खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.
(३) २००० नवीन चासीस खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया कार्यवाही सुरु आहे.

भाडेतत्वावरील नवीन १५० इलेक्ट्रीक बसेसपैकी दोन इलेक्ट्रीक बसेस पुणे-अहमदनगर-पुणे या मार्गावर चालनात असून उर्वरित बसेस टप्प्या-टप्प्याने मार्च २०२३ अखेर रा.प. महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट होतील.

भाडेतत्वावरील साध्या ५०० बसेसपैकी एकूण १५२ बसेस रा.प. महामंडळाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत.
(४), (५) व (६) प्रवाशांच्या सेवेसाठी नवीन पर्यावरण पूरक बसेस खरेदी करण्याच्या अनुषंगाने ५३०० ई-बसेस रा.प. महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात येणार आहे. यापैकी १५० ई-बसेस करीता पुरवठादारासमवेत करार करण्यात आला असून ५१५० ई-बसेस करीता निविदा प्रक्रिया प्रगत करण्यात आलेली आहे.

-----------------

## वरोली (जि.पालघर) नदीपात्रात रासायनिक द्रव्य पदार्थ सोडणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५१) * १८२९७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील दापचारी रबर बोर्ड, टोल नाका आणि शिवमंदिर या भागातील वरोली नदीपात्रात रासायनिक द्रव पदार्थ सोडल्यामुळे नदीचे पाणी दूषित झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीतील प्रदूषणामुळे हजारो मासे आणि अन्य जीव मृत झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नदीच्या पाण्यातून अनेक गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना सुरु असल्याने दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून याप्रकरणी वडवली ग्रामस्थांनी तलासरी पोलिसांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वरोली नदीपात्रात रासायनिक द्रव्य पदार्थ सोडणाऱ्यांवर कारवाई करुन नदीपात्र स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबत ग्रुप ग्रामपंचायत, वडवली-सवणे यांनी तहसिलदार, तलासरी, पालघर यांना दिलेले निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाले होते.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) • वरोली नदी काठावर गावच्या रहिवाश्यांसाठी शासनाद्वारे वासा पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असून वरोली नदीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत नाही.
• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे यांना दिनांक २४/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करून दोषी व्यक्ती विरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) • महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत गट विकास अधिकारी, तलासरी पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वडवली-सवणे आणि सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, वडवली-सवणे यांना दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधित नाल्यावर राष्ट्रीय राजमार्गाच्या दोन्ही बाजूस नाल्यामध्ये टाकाऊ रासायनिक द्रव्य पदार्थ न टाकणे या संबंधी खबरदारी बाबतचे सूचना फलक लावण्याचे आणि आरोपी सापडेपर्यंत सदर ठिकाणी चोवीस तास निगरानी करण्यासाठी कॅमेरा बसविण्याचे सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेत विभागीय समितीच्या पडताळणीत पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत

**(५२) * १७७२२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) महानगरपालिका हद्दवाढीच्या अधिसूचनेपासून ते दिनांक ६ जानेवारी, २०२१ च्या उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रकातील (अकोला-२०२०/प्र.क्र.५७/नवि-२६, दिनांक ६ जानेवारी, २०२१ उपसचिव, महाराष्ट्र शासन) निर्देशानुसार विभागीय समितीच्या पडताळणीत पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना परिपत्रकातील १८ मुद्यांच्या अधिन राहून तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे महानगरपालिका आस्थापनेवर समायोजन करावे, असे निर्देश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या परिपत्रकानुसार प्रथम पात्र, अपात्र यादी प्रसिध्द करणे, शासनाचे मार्गदर्शन, मंजूरी घेणे तद्नंतरच समायोजन करणे ही कार्यवाही अभिप्रेत असताना महानगरपालिका प्रशासनाकडून जाणीवपूर्वक चुकीची प्रक्रिया राबवून ३१ कर्मचारी पात्र असल्याचा अहवाल शासनाला देऊन ३१ पात्र कर्मचाऱ्यांची यादी अकोला महानगरपालिकेकडून प्रसिध्द करण्यात आली, तद्नंतर पात्र यादीतील विविध कारणान्वये ५ कर्मचारी अपात्र करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपात्र कर्मचाऱ्यांनी मा.न्यायालयात रिट याचिका दाखल केली असल्याने रिट याचिकेतील निर्देशानुसार (प्रतिवादी) पक्षकाराने ४ आठवड्यानंतर बाजू मांडेपर्यंत यथास्थिती कायम ठेवण्याबाबत मा.न्यायालयाने निर्देश दिले आहेत, परंतु, दिनांक २८ जून, २०२१ पासून माहे मे, २०२२ पर्यंत बाजू मांडून सदर प्रकरण निकाली काढण्याचे प्रयत्न शासनाने केले नसल्याने पात्र उमेदवारही समयोजनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

शासनाचे दिनांक ०६ जानेवारी, २०२१ रोजीच्या मार्गदर्शन पत्रामधील १८ मुद्यांचे अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तक व दस्ताऐवजांची पडताळणी करण्यात आली असता ३१ पैकी ५ कर्मचारी यांचे दस्ताऐवजांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले आहे.
(३) व (४) अपात्र कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. १८८९/२०२१ मध्ये पात्र कर्मचारी यादीस दिनांक २८ जून, २०२१ रोजी दिलेली स्थगिती दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ च्या आदेशान्वये उठविण्यात आली. त्यानुषंगाने व शासन पत्र दिनांक ०६ जानेवारी, २०२१ मधील १८ मुद्यांच्या अनुषंगाने प्रत्येक ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या दस्ताऐवजांची चेकलिस्ट तयार करण्याची कार्यवाही करण्यात आली असून पात्र कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याची बाब अकोला महानगपालिका स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील सिडको प्रशासनाने परवानगी दिलेल्या इमारती नियमबाह्य असल्याबाबत

**(५३) * १७०५१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२७४ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील सिडको प्रशासनाने सन २०१० च्या सुधारित नियमांच्या आधारे दिनांक २७ एप्रिल, २०१५ ते दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ या कालावधीत बांधकाम परवानगी दिलेल्या इमारतींपैकी ९९% म्हणजे ४९६ पैकी ४९३ इमारतींना नियमबाह्य परवानगी देण्यात आल्याची माहिती सिडको प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात दिल्याचे व ४९३ इमारतींची यादी सीलबंद लिफाफ्यात मा.उच्च न्यायालयात सादर केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील इमारतींच्या बांधकामांना मंजूरी देताना अनामत रक्कम, छाननी शुल्क इत्यादींची फेररचना करण्यासह फ्लॉवर बेड, कपबोर्ड, बाल्कनी, पॉकेट टेरेस अशा भागांचे बांधकाम हे प्रिमियम आकारुन चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त करण्यात यावे, असा ठराव करुन सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीत (जीडीसीआर) संबंधित सुधारणांचा ठराव सिडको प्रशासनाने दिनांक ९ जानेवारी, २००६

रोजी शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला असून सदर प्रस्तावास अद्याप परवानगी मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास कथित जीडीसीआरची परवानगी मिळाली नसतानाही त्याची अंमलबजावणी सिडको प्रशासनाने सुरु करुन याबाबत स्वतःच सन २०१० मध्ये नवी मुंबई जीडीसीआर १९७५ साठी नियम असा नियम करुन जीडीसीआर व राष्ट्रीय भवन संहितेचे उल्लंघन केल्याने अनेक विकासकांनी बांधकाम करताना सन २०१० च्या उक्त बेकायदा नियमांचे पालन न करता फ्लॉवर बेड, पॉकेट टेरेस इत्यादींचे क्षेत्रफळ परस्पर खोल्यांमध्ये समाविष्ट करुन मोठ्या सदनिका बांधत ग्राहकांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ४९६ पैकी ४९३ नियमबाह्य इमारतीवर कारवाई होणार असल्यामुळे इमारतीतील सदनिकाधारकांची फसवणूक व स्थानिक रहिवाशांवर अन्याय होणार असल्यामुळे उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) श्री.संजयकुमार सुर्वे यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्र.१५४/२०१६ दाखल केली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने बांधकाम परवानगी बाबतची माहिती सिडकोने मा.उच्च न्यायालयामध्ये सादर केली आहे.

(२) सिडकोने नवी मुंबई क्षेत्रासाठी लागू असलेल्या तत्कालीन नियमावलीमध्ये अधिमूल्य आकारणी करुन कपबोर्ड, फ्लॉवर बेड इ. बाबी चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त करणेची तरतूद नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेकामी सिडको मंडळाने दिनांक २३/१२/२००४ रोजी ठराव पारीत करुन त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) ची वैधानिक कार्यवाही करुन सिडको संचालक मंडळाने दिनांक २/१२/२००५ रोजी ठराव करुन सिडकोने दिनांक ९/१/२००६ रोजी शासनास मंजूरीसाठी पाठविला आहे. तथापि, राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर नियोजन प्राधिकरणाने क्षेत्रासाठी शासनाने दिनांक २/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावली मंजूर केली असून, सदर नियमावली ही सिडको नवी मुंबई क्षेत्रासाठी देखील लागू केली असल्याने, सिडकोने शासनाकडे दाखल केलेला प्रस्ताव मंजूर करणेची बाब राहत नाही.

(३) व (४) यासंदर्भात श्री.संजयकुमार सुर्वे यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५४/२०१६ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट असून, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, प्रकरणी त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानगरपालिकेमधील रेडीरेकनर दराचा कायदा रद्द करण्याबाबत

**(५४) * १७३०६ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व अमरावती विभागात अस्तित्वात असलेल्या नझूलच्या कायद्याप्रमाणेच महानगरपालिकेमध्ये सुध्दा स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याचा नियम अस्तित्वात असून दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा, नूतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ लागू करण्याकरीता अधिसूचना निर्गमित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९२७ मध्ये ज्यावेळी भाडेपट्टा देण्यात आला त्यावेळी महानगरपालिका समिती (Municipal Committee) नागपूरने सदर भूखंड प्रिमियम आकारुन देण्यात आला असूनही वारंवार भाडेपट्टा नूतनीकरण अथवा हस्तांतरण या नियमाखाली नागरिकांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कायद्यानुसार भाडेपट्टाधारकाला रेडीरेकनरच्या बाजारमूल्य दराच्या ८% रक्कम भरावी लागत असल्याने सदर कायदा रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेमध्ये भाडेपट्टाधारकाला रेडीरेकनरच्या बाजारमूल्य दराच्या ८% रक्कम भरावी लागणाऱ्या रक्कमेचा कायदा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

महानगरपालिकेच्या मालकीचे एकूण २२ अभिन्यास असून त्यातील भूखंडे ही वेळोवेळी विविध कालावधीत त्या त्या वेळेस घेतलेल्या निर्णयानुसार प्रिमियम घेऊन लिजवर देण्यात आलेली आहेत व अशा सर्व लिजवर देण्यात आलेल्या भूखंडाचे हस्तांतरण व नुतनीकरण करण्यासंबंधात मनपाने घेतलेल्या ठरावाव्दारे मान्य केलेल्या दरानुसार हस्तांतरण व नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते.

हस्तांतरण व नुतनीकरणाकरीता मनपाव्दारे दिनांक २०/१०/२०१८ ठराव क्र.२९९ अन्वये शेवटचे धोरण निश्चित करुन दिलेले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) या संदर्भात भाडेपट्ट्याबद्दलचे दर ठरविणे व नियम निश्चितीची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील "शेठ हाईट" इमारतीला आग लागल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(५५) * १८२६६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील अशोक सिनेमाजवळील "शेठ हाईट" या इमारतीला भीषण आग लागल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इमारतींना आग लागू नये याकरीता प्रतिबंधात्मक कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) चेंबूर (मुंबई) येथील आशिष सिनेमाजवळील "शेठ हाईट" या इमारतीच्या दुरुस्तीकरीता बाहेरील बाजूने उभारण्यात आलेल्या बांबुची परात व त्याला आवरण केलेल्या हिरव्या प्लास्टिकच्या जाळीला दिनांक ०४/०१/२०२३ रोजी आग लागली होती.
(२) सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर आग, धुम्रपान करुन निष्काळजीपणे टाकलेल्या सिगारेट अथवा बिडीमुळे लागली असल्याचे आढळून आले.

इमारतींना आग लागू नये याकरीता महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- १५ मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या बहुमजली इमारतींचा जोडभार २० कि.वॅ.पेक्षा अधिक व पुरवठा व्होल्टेज २५० व्होल्ट पेक्षा जास्त असले अशा इमारतींचे निरीक्षण, विद्युत निरीक्षकाकडून करण्याबाबत दिनांक ०४/०२/२०१६ रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.
- महाराष्ट्र आग प्रतिबंधात्मक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, उद्वाहन अधिनियम १९५८ मधील तरतूदीनुसार प्रामुख्याने २४ मीटरपेक्षा जास्त उंचीचे बहुमजली इमारती मध्ये फायर लिफ्ट तसेच इतर अग्निरोधक यंत्रणेची तरतूद करणे अनिवार्य आहे.
- मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्याकडून फायर ईव्हॅक्युएशन लिफ्ट संदर्भात दिनांक २०/०७/२०२२ रोजी नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे.
- कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत राज्यातील शासकीय व खाजगी रुग्णालये तसेच सार्वजनिक इमारतींमधील शॉर्ट सर्किट तसेच इतर विद्युत दोषांमुळे आग लागण्याच्या घटनांना आळा घालण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत दिनांक २७/०८/२०२१ रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत, नागरिकांमधून अग्निशामक स्वयंसेवक बनविण्याचा कार्यक्रम हाती घेऊन पहिल्या टप्प्यामध्ये अंदाजे ५,५०० नागरिकांना अग्निशामक स्वयंसेवकाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- दिनांक २४/०७/२०२१ पासून प्रोजेक्ट मुंबई या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने अग्निरक्षक हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून अंदाजे १६९४ एवढे अग्निरक्षक प्रशिक्षीत झाले आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत सर्वसामान्य मुंबईकरांसाठी व्याख्याने, मॉक फायर व ईव्हॅक्युएशन ड्रील्स, प्रशिक्षण इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील नळ पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५६) * १७०७६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील ६९ गावांतील नळ पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी रुपये ९७ कोटी खर्च करण्यात येऊनही नळ पाणीपुरवठा योजनेची कामे प्रलंबित असल्यामुळे ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, सचिव,नगरविकास विभाग, आयुक्त,वसई-विरार महानगरपालिका यांचेकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी स्मरण पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसई-विरार येथील ६९ गावांतील नळ पाणी योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वसईतील ६९ गावांच्या पिण्याच्या पाण्याची योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून खालील वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे :-

- वसई तालुक्यातील ६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनेची मालकी/अमंलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असून योजनेचे हस्तांतरण अद्याप महानगरपालिकेकडे झालेले नाही.
- तथापि, जिल्हाधिकारी, पालघर यांच्या स्तरावरील दिनांक ०७/०२/२०२० रोजी झालेल्या बैठकीत या योजनेतील मुख्य जलवाहिन्या व जलकुंभ कार्यान्वित करुन दिल्यानंतर महानगरपालिका क्षेत्रातील ५२ गावांची पाणीपुरवठ्याची जबाबदारी महानगरपालिकेने स्विकारावी असा निर्णय झाला.
- सदर ५२ गावांच्या वाढीव विकसित भागात पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने नवीन जलवाहिन्या खरेदीसाठी रुपये १९.०० कोटी खर्चास मंजूरी दिली आहे.
- उपरोक्त गावांच्या जलकुंभाचे रचनात्मक परिक्षण करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.
- तसेच जलकुंभ दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.
- उपरोक्त ५२ पैकी २५ गावांचा पाणीपुरवठा सुरु झाला असून उर्वरित गावांना डिसेंबर, २०२३ पर्यंत टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.
- शासनाकडून सुर्या योजनेतून वसई विरार शहर महानगरपालिकेस १८५ द.ल.लि. पाणीकोटा मंजूर केला आहे. सदर पाणी महानगरपालिकेस माहे एप्रिल, २०२३ अखेर उपलब्ध होणार आहे.
- अमृत २ योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील सर्व भागात पाणीपुरवठा विस्तारीकरणाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच वसई तालुक्यातील उर्वरित १७ गावातील पाणीपुरवठा योजनेची मालकी जिल्हा परिषद, पालघर यांची असून जल जीवन मिशन अंतर्गत सदरील गावाकरीता अर्नाळा व १६ गावे पाणीपुरवठा योजना (रेट्रोफिटींग) तयार करण्यात आली आहे व डिसेंबर, २०२३ पर्यंत या योजनेद्वारे सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची बाब पाणीपुरवठा विभागाने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे.वसंत सागर प्रॉपर्टी प्रा.लि. यांनी फोर्ट डिव्हीजन, मुंबई येथे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५७) * १७१४६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका "ए" विभागाकडे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी आ.क्र.३६४११ नुसार मे.वसंत सागर प्रॉपर्टी प्रा.लि, सिटी सर्व्हे नं १६८९, प्लॉट नं. ११, फोर्ट डिव्हीजन १३ ए रोड ऑफ नेताजी सुभाषचंद्र रोड, मुंबई यांनी इमारतीची पुनर्बांधणी करण्यासाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकासकाची मागणी विविध कारणे देऊन म.न.पा. पत्र क्र. ई बी/४२-५०/अेअ/१०/२००९ नुसार नामंजूर केली असतानाही विकासकाने महानगरपालिकेच्या अटी व शर्तीचे पालन न करता चार मजल्याचे अनधिकृत बांधकाम केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत/बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी दोषी विकासक व जागा मालकाविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मे.वसंत सागर प्रॉपर्टी प्रा.लि., सिटी सर्व्हे क्र. १६८९, प्लॉट नं. ११, फोर्ट डिव्हीजन १३ ए रोड यांच्या वसंत सागर या अधिकृत तळमजला + पाच (पार्ट) मजल्याच्या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्तावास अनुसरुन दिनांक २७/१०/२००८ रोजी अमान्यतेची सूचना व दिनांक १७/१२/२००८ रोजी बांधकाम परवाना देण्यात आला होता. तद्नंतर सदर इमारत दिनांक ०७/०३/२००९ रोजी धोकादायक घोषित करण्यात आली.

त्यानुसार वास्तुविशारदाने विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या ३३ (६) नुसार सदर इमारतीच्या सादर केलेल्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने स्टील्ट + एक ते पाच व सहा (पार्ट) अशा इमारतीकरीता दिनांक ०८/१०/२००९ रोजी अमान्यतेची सूचना देण्यात आली.

तद्नंतर वास्तुविशारदाने सादर केलेले सुधारित आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५/०६/२०१० रोजी मंजूर करण्यात आले व दिनांक ०५/०३/२०११ रोजी चौथ्या मजल्यापर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आली.

भारत सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय विभागाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजी जारी करण्यात आलेल्या सूचनेनुसार वास्तुविशारदाने तळघर + स्टील्ट + १३ मजल्यांच्या ५८.० मी. उंचीच्या इमारतीचा सुधारित आराखडा सादर केला. सदर सुधारित आराखडा दिनांक ०४/०५/२०१२ रोजी मंजूर करण्यात आला व दिनांक १३/०७/२०१२ रोजी १० व्या मजल्यापर्यंतच्या फक्त आर.सी.सी. बांधकामासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली.

सदर इमारत ही मरीन ड्राईव्ह प्रिसिंक्टमध्ये असून, विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील अधिनियम ६७ (२)(iii)(६) नुसार २४ मी. पेक्षा अधिक उंचीच्या इमारतीसाठी आयुक्तांची विशेष परवानगी आवश्यक असते. त्यानुसार सदर इमारतीच्या ५८.० मी. उंचीकरीता दिनांक १२/०४/२०१२ रोजी आयुक्तांची परवानगी घेण्यात आली आहे.

तथापि, सदर प्रकरणी चर्चगेट रहिवाशी संघाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ५४/२०१२ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ३०/०७/२०१२ रोजी पुढील बांधकामास स्थगिती आदेश दिले. तद्नंतर विकासकाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर स्थगिती आदेशाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक ९८८६/२०१४ दाखल केली असून, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१/०४/२०२१४ रोजी, इमारतीच्या उंचीबाबत यथास्थिती राखण्यात यावी, असे आदेश दिले आहेत. सदर बाब न्यायप्रविष्ट असून, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सद्य:स्थितीत सदर इमारत तळमजला + ३ वाहनतळ मजले + ७ मजले अशी असून, सदर इमारतीत चार मजल्यांचे अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अशा आशयाची लेखी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत

**(५८) * १७९४२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना खेळादरम्यान दुखापत झाल्यास त्यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत वैद्यकीय उपचार करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यास्तरावर निर्णयासाठी प्रलंबित असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेऊन मुंबई शहरात विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १४/०१/२०१९ रोजीच्या सभेमध्ये ठराव क्रमांक १४२२ अन्वये, मुंबई शहरातील विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या होतकरु खेळाडूंना खेळादरम्यान दुखापत झाल्यास त्यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकीय उपचार करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता.तथापि, महानगरपालिकेच्या दिनांक २३/१२/२०२१ रोजीच्या सभेमध्ये सदर ठराव दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता तातडीने रुग्णांना औषधोपचार देण्यात येतात. आर्थिकदृष्ट्या गरीब रुग्णांना वैद्यकीय समाजसेवकांमार्फत व गरीब रुग्ण

सहाय्यता निधी (पी.बी.सी.एफ.) मधून मोफत उपचार देखील देण्यात येतात. मुंबई शहरातील विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या होतकरु खेळाडूंना खेळादरम्यान दुखापत झाली आहे याची माहिती उपलब्ध झाल्यास त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणारे नातेवाईक, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा / महाविद्यालयातील विद्यार्थी, पोलीस कर्मचारी, कैदी, बेस्ट कर्मचारी व ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक इत्यादींना मोफत उपचार देण्यात येतात.

तसेच, रुग्णालयीन खर्च शक्य नसलेल्या रुग्णांना अधिष्ठातांच्या पूर्व परवानगीने खर्चामध्ये सूट देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या मागण्यांबाबत

**(५९) * १८१७७ श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १५४५४ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासकीय/निमशासकीय कार्यालय/मंडळामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना किंवा नातेवाईकांना वारसाहक्काने नियुक्ती देण्याबाबतच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरीता अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस, मुंबई यांनी लोकप्रतिनिधीमार्फत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे गत दोन वर्षांपासून अनेकवेळा तसेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सफाई कामगारांच्या पाल्यांना वारसाहक्काने नियुक्ती व इतर सोयी सुविधा देण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती गठीत करण्यात आली असून शासनाच्या विविध विभागाच्या १६-१७ शासन निर्णयाऐवजी एकच शासन निर्णय निर्गमित करुन सर्व घटकांना न्याय देण्यात येईल, असे आश्वासन मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी विधानपरिषद सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपसमितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर अहवालाच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत, सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने चौकशी करुन सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय/ परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन एकत्रित नवीन शासन निर्णय दिनांक २४/०२/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील जलवाहिन्यांची दुरुस्ती करुन सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६०) * १८४११ श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १५२१५ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात पाणीपुरवठा जलवाहिन्या आणि मलनिसारण वाहिन्या ना-दुरुस्त असल्यामुळे पाणी गळतीतून ४०० मी.लि. पाणीचोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व पाणीमाफिया यांचे आर्थिक संगनमत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसून यामध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप मुंबई जनता पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील पाणीचोरी रोखण्याबाबत तसेच पाणीपुरवठा जलवाहिन्या दुरुस्ती करुन सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) जुन्या जलवाहिन्या व त्यावर येणारा वाहतुकीचा भार, झोपडपट्ट्या, खारट जमीन इत्यादीमुळे तसेच विविध पायाभूत सुविधांची कामे सुरु असताना काही वेळेस जलवाहिन्यांना धक्का लागल्यामुळे पाणी गळती झाल्यास त्या तातडीने महानगरपालिकेमार्फत दुरुस्त केल्या जातात. तसेच गळतीबाबत तक्रार प्राप्त होताच त्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत तात्काळ दुरुस्ती करुन गळती थांबविली जाते.

मुंबई शहर व उपनगरांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या/ जीर्ण जलवाहिन्यांच्या दुरुस्तीची किंवा बदलण्याची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येतात. तसेच मल:निसारण वाहिन्या नादुरुस्त झाल्यास त्यांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

पाणीचोरी व पाण्याचा काळाबाजार यास आळा घालण्याकरीता महानगरपालिकेच्या "सार्वांसाठी पाणी" या धोरणांतर्गत निवासी जागांसाठी मागणीनुसार जलजोडण्या देण्यात येत आहेत. तसेच अनधिकृत जलजोडण्या, पाणीचोरी व पाण्याचा काळाबाजार याबाबत तक्रारी प्राप्त होताच त्यावर महानगरपालिकेमार्फत तात्काळ कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.